रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २१९
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पोयनाड बाजारपेठेत सुक्या मिरचीच्या खरेदीसाठी गर्दी/२
माथेरानमध्ये आग, वनसंपदेची हानी/५
युसूफ पठाणचे २० चेंडूत झंझावाती अर्धशतक/८

### अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप



**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीत आयोजित ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप रविवारी (दि. २३) झाला. समारोप समारंभाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, मराठी भाषामंत्री उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे, निमंत्रक संजय नहार, उज्वला मेहेंदळे, डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी.डी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. दिल्लीतील साहित्य संमेलन म्हणजे मराठी भाषेचा महाकुंभ आहे, असे उद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले, तर दिल्लीत मराठी लोकांसाठी एक भवन उभारले जाईल व त्यासाठी अर्थसंकल्पात हवी ती तरतूद केली जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. या वेळी संमेलनाध्यक्ष डॉ. भवाळकर व इतरांचा सत्कार करण्यात आला.

### राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून मुंबईत

# १० मार्चला अर्थसंकल्प

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे ३ ते २६ मार्च या कालावधीत होणार आहे, तर राज्याचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल.



मुंबईतील विधानभवन येथे रविवारी (दि. २३) विधानसभा आणि विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. या वेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, शंभुराज देसाई, आमदार सर्वश्री प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, अ‍ॅड. अनिल परब, हेमंत पाटील, श्रीकांत भारतीय, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, रणधीर सावरकर, अमिन पटेल, विधीमंडळ सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या.

अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत ८ मार्च रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधीमंडळाचे कामकाज सुरू राहील, तर १३ मार्च रोजी होळीनिमित्त कामकाजास सुट्टी देण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.

# भारताने पाकिस्तानवर साकारला विराट विजय

### चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये कोहलीचे शानदार शतक



**दुबई : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने रविवारी (दि. २३) कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा सहा गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तान संघ ४९.४ षटकांत २४१ धावांमध्ये गारद झाला होता. भारताने हे लक्ष्य ४२.३ षटकांत पार केले. भारताकडून स्टार फलंदाज विराट कोहलीने नाबाद शतकी खेळी केली.

तत्पूर्वी मोहम्मद रिझवान आणि सौद शकील यांनी रचलेल्या शतकी भागिदारीनंतरही भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानच्या डावाला ब्रेक लावला. अक्षर पटेलने रिझवानचा त्रिफळा उडवून ही जोडी फोडली. रिझवानचे अर्धशतक चार धावांनी हुकले. मग हार्दिक पांड्याने शकीलला ६२ धावांवर माघारी धाडले. त्यामुळे २ बाद १५१ धावांवरून पाहता पाहता पुढच्या ९१ धावांत अख्खा पाकिस्तान संघ गारद झाला. खुशदिल शाहने पुन्हा एकदा ३८ धावांची महत्त्वाची खेळी केली.

भारतीय संघासाठी मधल्या षटकांमध्ये कुलदीप यादवने वर्चस्व गाजवले. यादवने नऊ षटकांच्या स्पेलमध्ये ४० धावा देत तीन विकेट घेतल्या. त्याने प्रथम फॉर्ममध्ये असलेल्या सलमान आगाची विकेट घेतली, जो फक्त १९ धावा करून बाद झाला. त्याने शाहीन आफ्रिदीलाही गोल्डन डकवर बाद केले आणि नसीम शाहचा तिसरा बळी घेतला, ज्याने १४ धावा केल्या. त्याच्याशिवाय भारताकडून हार्दिक पंड्याने दोन विकेट घेतल्या, तर हर्षित राणा, अक्षर पटेल आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

भारताकडून विराटव्यतिरिक्त श्रेयस अय्यरने अर्धशतक (५६) केले. शुबमन गिल ४६ आणि कर्णधार रोहित शर्मा २० धावा करून बाद झाला. अक्षर पटेल (३) नाबाद राहिला.

दरम्यान, या सामन्यादरम्यान टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये इतिहास लिहिला आहे. त्याने एक विक्रम आपल्या नावावर केला आहे, जो आतापर्यंत क्रिकेटचा देव असलेल्या सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. पाकिस्तानविरुद्ध सामन्यात १५ धावा करताच विराटने वनडे क्रिकेटमध्ये १४ हजार धावा पूर्ण केल्या.

विराट एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १४ हजार धावा करणारा फलंदाज आहे. त्याने केवळ २८७ डावांमध्ये ही कामगिरी केली आहे. सचिनने वनडे क्रिकेटमध्ये ३५० डावात १४ हजार धावा पूर्ण केल्या होत्या. सचिनने २००६ साली पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावून या धावा पूर्ण केल्या होत्या.

एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात १४ हजारहून अधिक धावा करणारा विराट कोहली हा केवळ तिसरा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी भारताचा सचिन तेंडुलकर (१८,४२६ धावा) आणि श्रीलंकेचा कुमार संगकारा (१४,२३४ धावा) यांनी ही कामगिरी केली होती.

## उद्धवसेनेत दोन मर्सिडीज दिल्यावर एक पद!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात 'असे घडलो आम्ही' या कार्यक्रमात शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मोठा आरोप केला आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचे, असे खळबळजनक विधान डॉ. गोऱ्हे यांनी केले आहे.



नीलम गोऱ्हेंचा गंभीर आरोप

साहित्य संमेलनातील मुलाखतीत डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, कुठल्याही कार्यकर्त्याला कमी लेखण्याचे काही कारण नाही. २०१२वगैरे पर्यंत मी पाहत आले आहे की, शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की नेत्यांना संपर्क नको असेल तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळायचे. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचे सगळीकडे लक्ष होते. नंतर अवनती होत गेली.

२०१९ला जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा आम्हाला धन्यता वाटली होती, कारण बाळासाहेब ठाकरेंच्या मुलाला ते पद मिळाले याचा आम्हाला आनंद झाला होता, पण लोकांना भेटले गेले पाहिजे. ते होत नव्हते, असे सांगत डॉ. गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

## पीएम किसान सन्मान निधीचे आज वितरण

**नवी दिल्ली** : पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या १९व्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोमवारी (दि. २४) रोजी केले जाणार आहे. हा कार्यक्रम दुपारी दोन ते साडेतीनच्या सुमारास बिहारमधील भागलपूर या ठिकाणी पार पडणार आहे.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना केंद्र सरकारच्या कृषी आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून चालवली जाते. या योजनेच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये तीन समान हप्त्यांमध्ये दर चार महिन्यांनी दिले जातात. आतापर्यंत देशातील शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचे १८ हप्ते मिळाले आहेत.

## निवडक

### गुजरातमध्ये भीषण अपघातात पाच जणांचा मृत्यू, १० जखमी

**राजकोट** : गुजरातमधील लिंबडी-राजकोट महामार्गावर एका भरधाव डंपरने मिनी ट्रॅव्हलरला धडक दिल्याने पाच जणांचा जागीच मृत्यू, तर १० जण जखमी झाले आहेत. सुरेंद्रनगर जिल्ह्यात मोरवड गावाजवळील पुलावर हा भीषण अपघात झाला. अपघातानंतर महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. जखमींना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### बागेश्वर धाम मेडिकल अ‍ॅण्ड सायन्स रिसर्च इन्स्टिट्यूटचे भूमिपूजन

**छतरपूर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि. २३) दुपारी २ वाजता मध्य प्रदेशातील बागेश्वर धाम (जि. छतरपूर) येथे आले होते. त्यांनी येथील बालाजी मंदिरात पूजा केली. यानंतर व्यासपीठावरून बटन दाबून बागेश्वर धाम मेडिकल अ‍ॅण्ड सायन्स रिसर्च इन्स्टिट्यूटचे भूमिपूजन केले. या रुग्णालयाचा कर्करोग आणि इतर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना मोठा लाभ होईल, असे या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले





**नवी मुंबई : नेरूळ येथील किड्झ प्लॅनेट स्कूलचा वार्षिक कार्यक्रम रविवारी मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, विपुल चौटालिया आदी उपस्थित होते. या वेळी लहानग्यांनी आपल्या कला सादर केल्या. मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.**

# महाशिवरात्रीसाठी घारापुरी बेटावर सुरक्षेला प्रशासनाचे प्राधान्य

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जागतिक किर्तीच्या घारापुरी (एलिफंटा) बेटावर महाशिवरात्रीच्या निमित्ताने येणारे शिवभक्त भाविक, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी उरण तहसीलदारांच्या मागणीनंतर ओएनजीसीकडून सीएसआर फंडातून एक हजार लाईफ जॅकेट देण्यात आले आहेत.

महाशिवरात्रीला घारापुरी बेटावर दरवर्षी हजारो शिवभक्त, पर्यटक हजेरी लावतात. यामध्ये देशी-विदेशी नागरिकांसह स्थानिकांचाही मोठ्या प्रमाणात समावेश असतो. य वेळी बेटावर जाण्या-येण्यासाठी बंदर विभागाच्या देखरेखीखाली गेटवे ऑफ इंडिया, जेएनपीए, उरण मोरा, न्हावा बंदरातून होड्या, लाँचेस, मचव्यांची सोय करण्यात येत असते. यंदा २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री आहे. **(पान २ वर..)**

### शिवभक्त, पर्यटकांसाठी एक हजार लाईफ जॅकेट



### क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक केल्यास लॉन्चमालकांवर कारवाई

घारापुरी बेटावर महाशिवरात्रीनिमित्ताने ये-जा करणाऱ्या शिवभक्त व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी बैठकही बोलावण्यात आली होती. बेटावरच झालेल्या या बैठकीला मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुर्यकांत कांबळे, बंदर विभागाचे अधिकारी मोहन करंगुडे, एलिफंटा गेटवे जलवाहतूक संस्थेचे पदाधिकारी, पुरातत्व विभागाचे अधिकारी, सरपंच मिना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकूर, सदस्य, ग्रामस्थ, बोट मालक, व्यावसायिक प्रतिनिधी सचिन म्हात्रे, संतोष कोळी, सिक्युरिटी प्रतिनिधी उपस्थित होते. बोटीतून सागरी प्रवास करताना भाविक, पर्यटकांनी लाईफ जॅकेट वापरणे बंधनकारक आहे, तर क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या लॉन्चमालकांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा या वेळी देण्यात आला.

# वालाची शेती अंतिम टप्प्यात, शेंगा काढण्याची लगबग

**खोपोली : प्रतिनिधी**

फेब्रुवारी महिन्यातील शेवटच्या आठवड्यामध्ये रणरणत्या उन्हामुळे जमीन कोरडी पडू लागली आहे. अशात वालाच्या शेंगा तयार झाल्या असून त्या काढण्याची लगबग सुरू झाली आहे.

पावसाळा संपताच खालापूर तालुक्यातील बहुतेक शेतकरी आपल्या शेतामध्ये कडधान्य पिकांची लागवड करतात. यामध्ये मुग, हरभऱ्यासमवेत वालाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सध्या बहरलेल्या शेतीमध्ये आलेल्या वालाच्या शेंगा काढण्याची लगबग सुरू असून घरातील महिला, पुरुष शेतकरी रणरणत्या उन्हामध्ये शेतातील वालाच्या शेंगा काढण्याचे काम करीत आहेत. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात येथील वालाची शेती अंतिम टप्प्यात येईल, असे मत शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

या वर्षी वातावरणात उष्णता कमी होती. थंडीही कमी जाणवली. त्यातच काही वेळा ढगाळ वातावरण असल्यामुळे काही ठिकाणी वालाच्या शेंगांचे पीक हवे तसे आले नाही, परंतु काही शेतकऱ्यांनी उत्तम वाल शेती केल्याने ती बहरली आहे.

बाजारात हिरव्या वाल शेंगा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असल्याने पोपटी पार्ट्यांचा हंगामही जोरदार सुरू आहे. त्यामुळे दर्जेदार वाल शेंगांना मागणी वाढली आहे.



## मुरूड किनाऱ्यावर ग्रीन टर्टल मृतावस्थेत

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्रकिनारी ग्रीन टर्टल जातीचे मृत कासव रविवारी (दि. २३) वाहून आले. खोल समुद्रात मोठ्या जहाजांच्या पंख्यात अडकून कासव जखमी होऊन मृत होतात व वाहून किनाऱ्यावर येतात. यावर प्राणीमित्र चिंता व्यक्त करत आहेत.



यापूर्वी खोरा बंदर, गायमुख, राजपुरी, मुरूड, राजवाडा परिसरात अशी अनेक मृत कासवे आढळून आली आहेत. गेल्या १० वर्षात ४२ कासवांचे मृतदेह आढळलेत.

पूर्वी मुरूड किनाऱ्यावर कासव सायंकाळी अंडी घालण्यासाठी येत असत व त्यावर मातीचा ढिगारा करून समुद्रात जायचे. असे वर्षातून तीन वेळा होत असे, पण आता जहाजांची, पर्यटकांची वर्दळ वाढल्याने अंडी घालण्यासाठी कासव येण्याचे बंद झाले आहे. त्यांचे मृतदेहच वाहून येत आहेत. या संदर्भात उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## शुभेच्छा!



**पनवेल** : चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र येवले यांचा मुलगा शौनक याने नीट परीक्षेत ९८.९३ गुण मिळवून यवतमाळमधील श्री. वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालयात एमबीबीएस पदवीसाठी प्रवेश मिळवला आहे. शौनकची आई स्वाती येवलेदेखील शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून सेंट विल्फ्रेड हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये त्या प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. नीट परीक्षेतील यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शौनक व त्याच्या पालकांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिवरायांच्या किल्ल्यांना युनेस्को दर्जासाठी शिष्टमंडळाचा पॅरिस दौरा

## सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळ रवाना

**मुंबई,: प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्रीॲड् आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ आज पॅरिसला गेले

महाराष्ट्र शासनाने 'मराठा लष्करी भूप्रदेश' या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड किल्ल्यांचा राज्य शासनाचा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युनेस्कोकडे पाठवला त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व सादरीकरणासाठी जाण्याची संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही मंत्री ॲड्.शेलार यांनी आभार मानले आहेत.



या प्रस्तावाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यांचे शिष्टमंडळ २२ ते २६ फेब्रुवारी, या कालावधीत पॅरिस, फ्रान्स येथे गेले आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार करणार आहेत. इतर सदस्यांमध्ये अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उप संचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद श्रीमती शिखा जैन यांचा समावेश आहे.

या शिष्टमंडळाच्या पॅरिस दौऱ्याद्वारे, या किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि राजनैतिक सादरीकरण करण्यात येईल. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांना जागतिक स्तरावर ओळख मिळण्यास मदत होईल आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित होईल, अशी आशा मंत्री ॲड् आशिष शेलार यांनी व्यक्त केली आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाल्यास, या किल्ल्यांचे जतन, संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी अधिक संधी उपलब्ध होतील. ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि सांस्कृतिक वारशाचे जतन सुनिश्चित होईल, अस ॲड् आशिष शेलार यांनी सांगितले.

**१२ किल्ल्यांचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव**

*या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. याबाबतचे सादरीकरण पुर्ण क्षमतेने प्रभावीपणे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हे शिष्टमंडळ गेले आहे.*

# जाताडे येथून पाच तोळे सोन्याच्या गंठणची चोरी

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

रसायनीतील जाताडे येथील एका घरातून सोन्याच्या गंठणची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. सदर प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात चोराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाताडे येथे राहणारे लडकू मेढेकर यांचे किराणा मालाचे दुकान आहे. या दुकानाच्या मागील दरवाजास व्होल पाडून आतील कडी उघडून आत प्रवेश करून बेडरूमच्या लोखंडी कपाटातील तिजोरीमधील ५०.२०० ग्रॅम वजनाची सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने लंपास केली.

सदर प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# कर्जतमध्ये तक्रारदाराला मारहाण; सहा जणांना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत जामा मस्जीद विश्वस्त ट्रस्टचे निवडणूकी संदर्भात आयोजित केलेल्या मिटींग मध्ये झालेल्या वादाची तक्रार दाखल केली त्याचा मनात राग धरून तक्रारदार व त्याच्या सोबत असलेल्यांना मारहाण केली. मारहाण करणाऱ्या सहा जणांना कर्जत पोलिसांनी अटक केली आहे.




कर्जत जामा मस्जीद विश्वस्त ट्रस्टचे निवडणूकी संदर्भात आयोजीत केलेल्या मिटींग मध्ये झालेल्या वादाची तक्रार शहाबाज हुसेन मुल्ला याने कर्जत पोलिस ठाण्यात केली. त्याच्या समवेत जहुर निसार शेख, खलील जलगाव, मोजम कादिर पानसरे, निसार शेख आणि सैदू शेख करून हे सर्वजण घरी परत जात असताना बाजारपेठेकडे जाणा-या रस्त्यावर जहीर जमील खान याने तक्रारदार व त्याचे सहकारी यांच्या गाडया अडवुन सहकाऱ्यांनी त्यांना हाताबुक्यांनी मारहाण केली मारहण करून शिवीगाळी करून तुम्हाला बघून घेतो अशी धमकी देवुन सोहेल अन्सारी याने दगडाने साक्षीदार याचे डोक्याला मारून दुखापत केली आहे.

कर्जत पोलिसांनी जाहिर जलीम खान,, युसुफ अश्रफ खान, अनु राजपूत,चिनू उर्फ संकेत साळुंखे, सुजल अनिल साळुंखे, सोहेल सिद्दिक अन्सारी या सहा जणांना ताब्यात घेतले आहे. या बाबत कर्जत पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार भोईर हे करीत आहेत.

# पोयनाड बाजारपेठेत सुक्या मिरचीचा ठसका! खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड बाजारपेठ ही तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातील मोठया बाजारपेठांमधील एक म्हणून ओळखली जाते. पोयनाडचा दर सोमवारी भरणारा आठवडा बाजार हा जसा प्रसिद्ध आहे. तशीच पोयनाड बाजारपेठेची ओळख ही मिरची खरेदीसाठीची प्रसिद्ध बाजारपेठ म्हणून आहे. सध्या मिरची खरेदीचा हंगाम असल्याने मिरची खरेदीसाठी आणि मसाल्याच्या पूर्वतयारीसाठी पोयनाड बाजारपेठ फुलली असून ग्राहकांची विविध दुकानांमध्ये मोठी गर्दी दिसून येत आहे.



आपल्या सर्वांच्या जेवणातील अविभाज्य घटक म्हणजे मसाला होय. या मसाल्याची बेगमी पावसाळयापूर्वी केली जाते. मग तो वर्षभर पुरवला जातो. आणि हा मसाला बनविण्यासाठी आवश्यकता असते ती मिरची आणि मिरचीच्या विविध प्रकारांची. पोयनाड बाजारपेठेत प्रामुख्याने कर्नाटकातील संकेश्वर, आंध्रप्रदेश, सोलापूर, कोल्हापूर, गडहिंग्लज येथून मिरचीची आवक केली जाते. पोयनाड बाजारपेठेत संकेश्वरी, बेडगी, काश्मिरी, गंटूर, पट्टी, सिमला, आम्रपाली या प्रकारांमध्ये मिरची उपलब्ध आहे.

मिरची हा मसाल्याच्या तयारीसाठी आवश्यक घटक असल्याने त्याच्या खरेदीसाठी प्रामुख्याने महिलांची गर्दी असते. पोयनाड बाजारपेठेत मिरचीचा सध्या १५० पासून ते ३०० रूपये पर्यंत प्रतिकिलो असा दर आहे. मिरचीवर ५ टक्के जीएसटी व १ टक्के मार्केट सेस लागू आहे हे जरी असले तरी या मिरची खरेदीला ग्राहकांचा मोठा प्रतिसाद आहे. पावसाळ्याच्या पूर्वतयारीचा घटक म्हणून मिरची खरेदी करणे, त्या मिरचीचे देठ मोडणे, ती मिरची चांगल्या उन्हात वाळवणे, आणि त्या मिरचीचा मसाला बनवणे हा गृहिणींचा एक दरवर्षीचा नित्यक्रम झाला आहे. प्रामुख्याने पावसाळ्याआधी पूर्वतयारी म्हणून हा मसाला तयार करून काचेच्या बरणीत भरून वर्षभर तो मसाला जेवणामध्ये वापरला जातो. अशी ग्रामीण भागांमध्ये प्रथा आहे. आता हीच प्रथा महानगरांमध्ये देखील अवलंबण्यास सुरूवात झाली आहे.

पोयनाड बाजारपेठेत सध्या मिरचीचा हंगाम असल्याने दररोज १५० ते २०० पोती मिरची पोयनाड बाजारपेठेत येते . या पोयनाड बाजारपेठेत पंचक्रोशीसह संपूर्ण अलिबाग तालुका, मुरूड, पनवेल, नवी मुंबई येथून ग्राहक खरेदीसाठी येतात.त्यामुळे सध्या पोयनाड बाजारपेठेत खरेदीसाठी मोठी गर्दी दिसून येत आहे.

### हळदीलाही मोठी मागणी

**पोयनाड बाजारपेठेत सांगली येथून हळदीची आयात केली जाते. लग्नकार्य, घरातील जेवणातला वापर यासाठी हळदीचा वापर होतो. हळदीचा १८० ते २४० रूपये पर्यंत प्रतिकिलो असा दर आहे. या शिवाय मसाला तयार करण्यासाठी धणे, राई, जिरे, मिरी, शहाजीरा, नाकेश्वर, चिरफूल, मायपत्री, बादीयान, हिंग, लवंग, दालचिनी, म. वेलची, खसखस, बडीशेप, तमालपत्र, दगडफूल हे घटक आवश्यक असतात. ग्राहकांची या घटकांना मोठी पसंती असते.**

# कर्जतच्या माले येथे हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील माले या गावातील हनुमान मंदिराला दीडशे वर्षांची परंपरा आहे. हनुमताची तालुक्यात सर्वात उंच मूर्ती या मंदिरात असून कौलारू अवस्थेतील पडझड होत असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार ग्रामस्थांनी लोक सहभागातून केला आहे.



साळोख ग्रामपंचायत मधील या माले गावातील हनुमान मंदिर किमान १५० वर्षांपूर्वीचे आहे. त्या कौलारू स्थितीतील मंदिरात भगवान श्री हनुमान मंदिर यांची मूर्ती ही कर्जत तालुक्यातील सर्वात उंच मूर्ती समजली जाते. पूर्वीचे कौलारू २० बाय २५ फूट या आकाराचे होते. मंदिराचा परिसर मोकळा असल्याने तीन गुंठे जमीन गावठाण जमिनी मधील मंदिर नव्याने उभे राहावे यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न सुरू केले.

त्यासाठी सर्वात आधी राज्याचे माजी परिवहन मंत्री अनिल परब यांनी आपला दहा लाखाचा आमदार निधी देण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर ग्रामस्थांनी मंदिराच्या जीर्णोद्धार संकल्प सोडला. दीड वषापूर्वी मंदिराच्या जीर्णोद्धार कामाला सुरुवात झाली आणि आज २७ फूट रुंद आणि सुरू ४३ फूट लांब असे प्रशस्त मंदिर उभे राहिले आहे.या नव्याने उभ्या राहिलेल्या मंदिराचा कलश जमिनीपासून ३५ फूट उंच आहे.

विधान परिषद सदस्य अनिल परब यांचा स्थानिक विकास निधी तसेच रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी पाच लाख रुपये सेस निधी सभामंडप साठी वर्ग केला होता.त्याशिवाय आमदार महेंद्र थोरवे,माधवी नरेश जोशी,माजी सभापती राहुल विशे,भाजप नेते किरण ठाकरे,तसेच के डी पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी देणगी स्वरूपात मदत केली आहे.माले या गावातील १४९ ग्रामस्थांनी वर्गणी दिली असून दीड वर्षात पूर्ण झाले.या मंदिरातील भगवान हनुमानाच्या मूर्तीचे वैशिष्ट म्हणजे मूर्ती सहा फूट उंच असून मूर्तीची जाडी १८ इंच तर रुंदी ५० इंच म्हणजे सव्वा चार फूट एवढी आहे. त्यामुळे माले गावातील हनुमान मंदिरातील मूर्तीला तालुक्यातील सर्वात उंच हनुमान मूर्ती समजले जाते.

मंदिराच्या जीर्णोद्धार निमित्ताने पुरोहितांच्या मंत्रीउच्चार मध्ये होमहवन आणि विधी करण्यात आले.गणेश पूजन,पुण्यह,कुटीर हवन,शांती होम,जल श्रीवास आदी विधी गुरुवर्य जानकीनाथ महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत कमलाकर बिलवकर पुरोहित यांनी पूर्ण केले. कलशारोहण गुरुवर्य जानकीनाथ बाबा यांच्या हस्ते झाले. जीर्णोद्धार निमित्ताने आदल्या रात्री पालखी गावप्रदक्षिणा झाली.या सोहळ्यात सर्व ग्रामस्थ सहभागी झाले.तर हरिपाठ श्री विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ पाषाने यांनी सादर केला भजनाची बारी प्रसिद्ध गायक नयन गवळी आणि सहकाऱ्यांकडून झाली.

# वृक्ष, फुले, फळे आणि भाजीपाला प्रदर्शनात मध्य रेल्वे प्रथम

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने ठाणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण आणि फलोत्पादन विभागाने दि. १४ ते १६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान ठाणे येथील रेमंड रेस ट्रॅक येथे आयोजित केलेल्या १४व्या वार्षिक वृक्ष, फुले, फळे आणि भाजीपाला प्रदर्शन व वृक्षवल्ली प्रदर्शनासाठी प्रथम पारितोषिक जिंकले आहे.

मध्य रेल्वेने १५ श्रेणींमध्ये पुरस्कार जिंकले ज्यात एकूण प्रदर्शनासाठी आणि कंटेनरमध्ये वाढवलेल्या हंगामी वनस्पतींसाठी २ प्रथम पारितोषिके, पानांच्या कुंडीतील रोपे, फुलांच्या कुंडीतील रोपे, हंगामी कापलेली फुले, सुगंधी वनस्पती आणि लँडस्केपसाठी ५ द्वितीय पारितोषिके, गट प्रदर्शनासाठी सनी पोझिशन, मास डिस्प्ले शॅडी पोझिशन, कॅक्टस आणि ब्रोमेलियाड्स, ब्रोमेलियाड्स, ऑर्किड्स, गुलाब (एचटी), गुलाब (सूक्ष्म) आणि कुंड्यांमध्ये अव्हेन्यू ट्रीजसाठी ८ तृतीय पारितोषिके या गोष्टीचा समावेश आहे.

भाजीपाला, फळे आणि फुले प्रदर्शन-२०२५ मध्ये उपविजेता चॅम्पियनशिप ट्रॉफी ८ आणि दि. ९ फेब्रुवारी रोजी मुंबईतील माटुंगा येथील डीजी रूपारेल कॉलेजमध्ये नॅशनल सोसायटी ऑफ फ्रेंड्स ऑफ द ट्रीजने आयोजित केलेल्या ६२ व्या वार्षिक भाजीपाला, फळे आणि फुले प्रदर्शन-२०२५ मध्ये मध्य रेल्वेने उपविजेता चॅम्पियनशिप ट्रॉफी जिंकली आहे.

मध्य रेल्वेने ९ श्रेणींमध्ये पुरस्कार जिंकले ज्यात डॉ. चंद्रकांत साळुंके रोलिंग ट्रॉफी, एकूण कामगिरीसाठी उपविजेत्या संघाला प्रदान करण्यात आली,जीएम बंगलो गार्डनसाठी सर्वोत्कृष्ट बाग श्रेणीमध्ये पहिला पुरस्कार डीए रोड रोलिंग ट्रॉफी आणि बधावर पार्क गार्डनसाठी पहिला पुरस्कार फ्रेंड्स ऑफ ट्रीज रोलिंग ट्रॉफी, सावलीच्या परिस्थितीच्या मोठ्या प्रमाणात प्रदर्शनासाठी पालेकर अँड कंपनी रोलिंग ट्रॉफी, कंटेनरमध्ये वाढवलेल्या फळे आणि भाज्यांसाठी थिया सी श्रॉफ रोलिंग ट्रॉफी, कंटेनरमध्ये वाढवलेल्या वार्षिक वनस्पतींसाठी नाइट फ्रँक रोलिंग ट्रॉफी, कुंड्यांमध्ये वाढवलेल्या फुलांच्या रोपांसाठी रायका जे गोदरेज रोलिंग ट्रॉफी, कापलेल्या फुलांसाठी द्विवार्षिक आणि बारमाही वनस्पतींसाठी फ्रेंड्स ऑफ ट्रीज रोलिंग ट्रॉफी या गोष्टींचा समावेश आहे.

या प्रदर्शनांत २०० हून अधिक वनस्पती प्रजाती प्रदर्शित केल्या आहेत, ज्यामध्ये इनडोअर, आउटडोअर, औषधी, सुगंधी, फन, ऑर्किड, हँगिंग बास्केट, व्हर्टिकल गार्डन, बोन्साय, कॅक्टस इत्यादी ५००० हून अधिक वनस्पतींचा समावेश आहे.मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्मवीर मीना यांनी मध्य रेल्वे फलोत्पादन टीमचे त्यांच्या समर्पण आणि कठोर परिश्रमाबद्दल अभिनंदन केले.



पान १ वरुन

### महाशिवरात्रीसाठी घारापुरी बेटावर सुरक्षेला प्रशासनाचे प्राधान्य

दरम्यान, गेटवे ऑफ इंडिया-एलिफंटादरम्यान १८ डिसेंबर रोजी निलकमल बोटीला झालेल्या अपघातात १५ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर महाशिवरात्रीनिमित्ताने घारापुरी बेटावर ये-जा करणाऱ्या शिवभक्त व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक बोटीत लाईफ जॅकेटची व्यवस्था करण्यासाठी उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी पुढाकार घेतला आहे. तहसीलदारांनी लाईफ जॅकेटसाठी ओएनजीसी प्रकल्प अधिकाऱ्यांना पत्र पाठवून मागणी केली होती. या मागणीची दखल घेत ओएनजीसी प्रशासनाने सीएसआर फंडातून एक हजार लाईफ जॅकेट उपविभागीय अधिकारी पवन चांडक व तहसीलदार डॉ. कदम यांच्याकडे नुकतेच सुपूर्द केले.

# कावाडे येथे श्री दत्तगुरू प्रतिष्ठानचा वर्धापन दिन उत्साहात



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील कावाडे येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. जगन्नाथ जोमा पाटील व त्यांचा परिवार श्री दत्तगुरु प्रतिष्ठापणा दिनानिमित्त गेल्या अनेक वर्षापासून कार्यक्रम आयोजित करीत आहे.

या कार्यक्रमानिमित्त श्री हनुमान महिला हरिपाठ मंडळ देहन पोईनाड यांनी भव्य कार्यक्रम सादर केला गायिका संध्या पाटील मृदंगपणे महेंद्र जुईकर व त्यांचे सर्व सहकारी यांनी खारेपाटातील भाविकांना व रसिक प्रेक्षकांन माऊली ज्ञानेश्वर विठ्ठल रुक्माई संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे विविध अभंग हरिपाठद्वारे सादरीकरण करून बहुसंख्य रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

तसेच संगीत भजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले सदर कार्यक्रमाला संपूर्ण खारेपाट विभागातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते त्यांनी महाप्रसादाचा व या कार्यक्रमाचा लाभ घेतला सुगंधा जगन्नाथ पाटील व परिवाराने भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

कार्यक्रम पाहण्यासाठी मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित उपस्थित होते. या वेळी हरिपाठातील महिला मंडळाला प्रेक्षकांनी पारितोषिक दिले. अलिबाग तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी अमित नाईक तसेच पंचायत समितीचे माजी उपसभापती अनिल पाटील पंचक्रोशीतील विविध मंडळी उपस्थित होते.

# वीज बिल थकबाकीदारांवर कारवाई

## उरण महावितरणकडून पुरवठा तात्पुरता खंडित

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील सहा हजार ७५१ ग्राहकांकडे महावितरणची २० फेब्रुवारी २०२५पर्यंत तीन कोटी ३९ लाख ९० हजार ५३७ रुपये थकीत आहेत. थकीत रकमेच्या वसुलीसाठी महावितरणने जोरदार मोहीम सुरू केली असुन ७२५ ग्राहकांवर तात्पुरता वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती अतिरिक्त कार्यकारी अभियंता जयदीप नानोटे यांनी दिली आहे.

उरण तालुक्यात वाणिज्य, घरगुती आणि सार्वजनिक असे एकूण ६७९११ ग्राहक आहेत. यामध्ये घरगुती ५५८००, वाणिज्य ७५५०, औद्योगिक ६८० आदी ग्राहकांचा समावेश आहे. यापैकी घरगुती ५४९० ग्राहकांकडे एक कोटी १७ लाख ५० हजार ५२९.८८, औद्योगिक ९० ग्राहकांकडे एक कोटी ६४ लाख २४ हजार ११९.२२, वाणिज्य ११७१ ग्राहकांकडे ५८ लाख १५ हजार ८८७.९८ अशी एकूण ६७५१ ग्राहकांकडे महावितरणची २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत तीन कोटी ३९ लाख ९० हजार ५३७.८८ रुपये थकीत आहेत. यापैकी थकित असलेल्या ७२५ ग्राहकांना थकीत बीलांची रक्कम जमा करण्यासाठी वारंवार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, मात्र त्यानंतरही बीले भरण्यास दिरंगाई करणाऱ्या ७२५ ग्राहकांवर तात्पुरता वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

वरिष्ठांच्या आदेशानंतर उरण महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता जयदीप नानोटे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यात जोरदार थकित बिले वसुलीसाठी सक्तीची मोहीम हाती घेतली आहे. यासाठी कर्मचाऱ्यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली आहेत. वीजेची थकबाकी भरण्यास टाळाटाळ केली तर वीजपुरवठा खंडित करण्याच्याही सक्तीच्या सुचना कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

वीज वसुली अंतर्गत वीज चोरीच्याही एक केस दाखल झाली आहे. त्यामुळे केसेस दाखल झालेल्या आणि वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई झालेल्या ग्राहकांनी शेजारी, जवळपास असलेल्या घरातील मीटर मधुन वीज घेतली आहे असे गैरप्रकार करू नये, असे आवाहन करतानाच अशा ग्राहकांवरही वीजचोरी, वीजपुरवठा खंडित करण्याचा इशारा नानोटे यांनी दिला आहे.

नागरिकांनी वीजपुरवठा खंडित होण्याच्या कारवाईपासून वाचण्यासाठी तत्काळ वीजेच्या बिलांचा भरणा मुदतीत करावा, असे आवाहन उरण महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता जयदीप नानोटे यांनी नागरिकांना केले आहे.

# मुलाशी अश्लील चाळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठेतील एका सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील वॉर्डबॉयने एका १८ वर्षीय अल्पवयीन मुलासोबत अश्लील चाळे केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील २७ वर्षीय वॉर्ड बॉयविरोधात पॉक्सोसह लैंगिक चाळे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

### वॉर्डबॉयला अटक

या प्रकरणातील पीडित मुलगा पनवेलमध्ये राहण्यास आहे. गत गुरुवारी तो आईला कामोठे येथील एका खासगी सुपरस्पेशालिटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यास आला होता. रात्रीच्या वेळी आपल्या आईची देखभाल करण्यासाठी तो रुग्णालयामध्ये थांबला होता. सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगा झोपेला होता. वॉर्ड बॉयने ही संधी साधत मुलाचे कपडे काढून त्याच्यासोबत अश्लील व लैंगिक चाळे केले.

या प्रकारानंतर जाग आल्यानंतर त्याने वॉर्ड बॉयला विरोध केला. त्यानंतर त्याने आपल्या आई-वडिलांना सर्व माहिती कळवल्यानंतर कामोठे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार या प्रकरणातील वॉर्ड बॉयविरोधात पॉक्सोसह लैंगिक चाळे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी दिली.



**पनवेल : येथील कुणाल भगत आणि बिग बॉस फेम अंकिता वालावकर यांच्या लग्नाच्या रिसेप्शनला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले. या वेळी भाजप सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, गणेश जगताप आदी उपस्थित होते.**



**पनवेल : तालुक्यातील आसुडगाव येथील श्री साई मंदिराचा प्रथम वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# आदिवासी मुलांना विविध वस्तूंचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल लाईफ केअर असोसिएशन नवीन पनवेल यांच्यातर्फे तालुक्यातील करबेळी भल्याचीवाडी यलमाळ मोरबे आदिवासीवाडी मुलांना दप्तर, खाऊ, कपडे, साड्या वाटण्यात आले होते.

या वेळी अध्यक्ष सविता सवाई, सेक्रेटरी एकनाथ चिरले, जितेंद्र नाळे, अशोक सांगले, हेमंत खिरे, स्वाती सोरटे, विनोद पाचघरे, शंकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, बापु चौधरी, किरण भगत आदी उपस्थित होते.



# उलवेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची वॉरियर्स क्लबला सदिच्छा भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सुप्रसिद्ध 'वॉरियर्स क्लब' या शिवकालीन मराठी मातीतल्या मर्दानी पारंपारिक खेळांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला उलवे पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने यांनी भेट दिली व लाठीकाठी खेळणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत लाठी खेळण्याचाही आनंद लुटला.



वॉरियर्स क्लबचे प्रशिक्षक ओमकार सागर रंधवे आणि कुमारी ऋतुजा सागर रंधवे यांनी उपस्थित चिमुकल्या वॉरियर्स आणि उपस्थित ज्येष्ठ नागरिकांसमवेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि प्रशिक्षण वर्गाला भेट दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. मराठी मातीतल्या शिवकालीन पारंपरिक मर्दानी खेळांचे वरीष्ठ पोलीस निरिक्षक अर्जुन रजाने साहेब यांना विलक्षण आकर्षण असून त्यांनी स्वतः लाठी-काठी खेळ शिकण्याचा आनंद चिमुकल्यांसोबत लुटला.

या वेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने म्हणाले की, मला लाठी काठी या खेळाचे अनेक वर्षांपासून आकर्षण असून आज येथे ही लहान मुले हा खेळ शिकतात व सफाईदार पुणे लाठी चालवतात याबद्दल कुतुहल वाटते. त्यांनी वॉरियर्स क्लबचे प्रशिक्षक ओमकार रंधवे व कु. ऋतुजा रंधवे यांचेही कौतुक व अभिनंदन केले.

या वेळी क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे, ज्येष्ठ नागरिक संघाचे बाळासाहेब भोईर, मोहनराव गाडे, भाऊसाहेब गोडे, सुदाम बच्चे, मधुकर दुबे, पांडुरंग शिंदे, तुकाराम कोरडे,राजाराम कोळी आदी ज्येष्ठ नागरिक तसेच पालक आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# कथ्थक स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटर आणि कर्नाटक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय एकल कथ्थक नृत्य स्पर्धेचे आयोजन पनवेलमध्ये नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यभरातून तब्बल ५१ स्पर्धकांनी भाग घेतला होता.



मानसी देशपांडे आणि चेतन सरय्या या कथ्थक क्षेत्रातील दोन दिग्गज व्यक्तींनी स्पर्धेचे परीक्षण आणि सर्व स्पर्धकांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेच्या गट १ (अ) मध्ये मिहीका भिडे हिला प्रथम, अनाहिता बहुगुणा हिला द्वितीय आणि स्वरा इशवाद व रचना बेंबळीकर या दोघींना तृतीय पारितोषिक विभागून देण्यात आले. गट १ (ब)मध्ये अभिज्ञा जोशी हिला प्रथम, तर अनन्या माकोडे हिला द्वितीय पारितोषिक देण्यात आले. गट २मध्ये सुहानी भट हिला प्रथम, सहिष्णुता राजाध्यक्ष हिला द्वितीय, तर पराग कुंभार याला तृतीय पारितोषिक देण्यात आले.

पनवेल कल्चरल सेंटरच्या नृत्यविभाग प्रमुख श्रीकला जोशी यांनी या स्पर्धेचे अतिशय नेटके आणि काटेकोर नियोजन केले होते. या वेळी पनवेल कल्चरल सेंटरचे अध्यक्ष मिलिंद गोखले तसेच कर्नाटक संघाचे उपाध्यक्ष गुरुप्रसाद शेट्टी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे खारफुटी स्वच्छता मोहीम

## पर्यावरण संरक्षणासाठी योगदान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व एन्व्हायरमेंटल लाईफ फाउंडेशन तुमच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२३) सीवूड नवी मुंबई येथील समुद्र किनाऱ्यावर स्थित असलेल्या वनक्षेत्राला भेट देऊन जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी खारफुटी (मॅन्ग्रोव) स्वच्छता मोहीम राबविली.



यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी मंग्रोव्ह वनांची स्वच्छता केली तसेच येथील स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि स्वयंसेवी संस्था यांना ही स्वच्छता मोहीममध्ये समाविष्ट करून घेतले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी मॅन्ग्रोव वनस्पतींच्या आसपास पसरणारे प्लास्टिक व कचरा जमा करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले.

या मोहिमेचा उद्देश मॅन्ग्रोव क्षेत्रातील प्रदूषण कमी करणे आणि समुद्राच्या किनाऱ्यावरील जैवविविधतेला सुरक्षित ठेवणे हा आहे. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या पर्यावरणीय उपक्रम यशस्वी राबविल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे व प्राध्यापक व स्वयंसेवकांचे अभिनंदन केले.

या पर्यावरणीय उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. शुभम शर्मा, प्रा. नीलम मोरे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. मनोज यादव व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमासाठी सहकार्य केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातील विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंटने शनिवारी इंडियन नॉलेज सिस्टम या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेतला.




महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील द्वितीय वर्षाच्या समता सलते, ईरम पारकर, युवराज सिंग देवरा, दीक्षा लहाने, नक्षत्रा दास संजना जाधव, श्वेता चव्हाण, श्वेता भारद्वाज व प्रा. राहुल कांबळे व प्रा. विशाल देशमुख यांनी खाजगी क्षेत्रातील कामगारांसमोर असणारी आव्हाने व छोट्या व्यवसायावरील फायनान्शियल अनालिसिस या विषयावर संशोधन लेख लिहून ते या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये वेगवेगळी सादरीकरण कौशल्ये वापरून उत्कृष्टरित्या सादर केले.

या सर्व विद्यार्थ्यांना अकाउंट व फायनान्स विभागातील प्रा. राहुल कांबळे, प्रा. विशाल देशमुख, प्रा. तनुजा सुमन, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. मनोज यादव व प्रा. प्रमोद वाघे या सर्वांचे संशोधन लेख लिहिण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, या रामशेठ ठाकूर महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येतात.

# पनवेलमध्ये दासनवमी महोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील पुरातन रामदास (मारुती) मंदिरामधे सुरू झालेल्या दासनवमी उत्सवाची सांगता झाली. यानिमित्त ह.भ.प. समीरबुवा ओझे यांचे कीर्तन संपन्न झाले. त्याना चंद्रकांत मने यानी संवादिनी व शार्दूल डोंगरे यांनी तबलासाथ केली. मंदिराच्या या सोहळ्याचे हे १०८ वे वर्ष होते.

या निमित्ताने गेले दहा दिवस गायन, नाटिका, भजन, भारुड, कीर्तने, व्याख्याने व दासबोध वाचन असे विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. या सर्व सोहळ्याची सांगता महाप्रसादाने झाली.

मंदिराचे विश्वस्त चंद्रशेखर खरे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, हा सोहळा प्रतिवर्षी आयोजित केला जातो. यामधे स्थानिक तसेच राज्यभरातील अनेक नामवंत कलाकार आपली सेवा मनोभावे सादर करतात. या मंदिरात हनुमान जयंती, तुकाराम बीज, नाथषष्ठी, संत ज्ञानेश्वर संजीवनसोहळा, परशुराम जयंती, शंकराचार्य जयंती, आदी उत्सवही भक्तिभावात होत असल्याची माहिती खरे यांनी दिली.





**खारघर : सेक्टर १३ येथे द्वारकादास शामकुमार एक्स्प्रेसच्या वातानुकूलिक महावस्त्रदालनाचा भव्य शुभारंभ रविवारी राज्याचे सहकारमंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाला. या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भाजप जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस नरेश ठाकूर, समीर कदम यांच्यासह नागरिक उपस्थित होते.**

## संपादकीय

# सामान्यांच्या गृहस्वप्नाला बळ

केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुणे बालेवाडी येथे झालेल्या प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीपत्र वितरण व १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण शनिवारी करण्यात आले. मोदी सरकारच्या या योजनेमुळे अनेकांचे गृहस्वप्न साकार होतंय.

**भारताला महासत्तेच्या दिशेने घेऊन चाललेले पंतप्रधान नरेंद्र मोदी या प्रवासात सर्वसामान्य लोकांनाही सोबत घेऊन त्यांची उन्नती साधू इच्छितात. सलग तिसऱ्यांदा देशाचे नेतृत्व करण्याची संधी एकशेतीस कोटींहून अधिक जनतेने दिलेली असताना त्यांचे जीवनमान कसे सुकर होईल या दृष्टीने मोदी सरकार कार्यरत आहे. त्या अनुषंगाने विविध योजनांद्वारे गोरगरीबांना दिलासा देण्याचे काम सुरू आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, उज्ज्वला योजना, पीएम विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, आयुष्मान भारत योजना, अटल पेन्शन योजना, जन धन योजना यांसारख्या अनेक योजना आज देशवासीयांच्या जीवनात प्रकाश आणण्याचे काम करीत आहेत. महिलांसाठी माझी कन्या भाग्यश्री योजना, समृद्धी सुकन्या योजना, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, लखपती दिदी योजना; तर युवकांसाठी पंतप्रधान रोजगार योजना, आत्मनिर्भर भारत योजना, पीएम मुद्रा कर्ज योजना, पीएम वाणी योजना आदी योजना आहेत. अशा प्रकारे मोदी सरकारने सर्व घटकांसाठी योजना आणून सबका साथ सबका विकास हे सूत्र खऱ्या अर्थाने अमलात आणले आहे. मानवी जीवनात अन्न, वस्त्र, निवारा या तीन प्राथमिक गरजा आहेत. अन्नाची प्रमुख गरज प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेद्वारे भागवली जात आहे, तर तितक्याच्या महत्त्वपूर्ण निवाऱ्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना राबविली जात आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या ग्रामीण टप्पा-२मध्ये राज्यात २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीचे पत्र, तर १० लाख लाभार्थ्यांना घरकुलासाठी प्रथम हप्ता वितरण करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुलात शनिवारी झाला. या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात पाच लाभार्थ्यांना मंजुरीपत्र ना. शाह यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्राला पहिल्याच वर्षी विक्रमी २० लाख घरे दिल्याचे सांगून या योजनेच्या पहिल्या टप्प्यात १३.५७ लाख घरे मिळाली होती. त्यापैकी १२.६५ लाख घरे बांधून पूर्ण झाली असून उर्वरित घरांचे काम सुरू असल्याची माहिती दिली. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत आतापर्यंत एक लाख ६० हजारांचे अनुदान देण्यात येत होते. त्यामध्ये आता ५० हजारांची वाढ करण्यात आली असून लाभार्थ्यांना दोन लाखांपेक्षा अधिक अनुदान मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-१ अंतर्गत १३.५७ लाख आणि टप्पा-२ अंतर्गत २० लाख घरे यांसह रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, अहिल्या आवास योजना, अटल बांधकाम कामगार योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, ओबीसींसाठीच्या मोदी आवास या सर्व योजनांतर्गतची १७ लाख अशी एकूण ५१ लाख घरे देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू आहे. यासाठी सुमारे ७० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात येत असून यात सोलर अनुदान जोडले जाईल. यातून सामान्यांचे गृहस्वप्न साकार होत आहे.**

# जागतिक मुद्रण दिन विशेष

आज मुद्रणाचे आपल्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नव्या तंत्रसाधनांच्या आगमनामुळे तर मुद्रण जनसामान्यांच्या आवाक्यात आले आहे. कार्यालयांतली कागदपत्रे असोत वा साहित्यपर वा इतर पुस्तके, मुद्रणसाधनांतील प्रगतीमुळे पूर्वीपेक्षा मुद्रणाचे प्रमाण नक्कीच वाढलेले दिसेल. आताशा डिजिटल माध्यमाचा प्रसार होऊ लागला असला तरी मुद्रण हेच अजूनही अनेकांना सोयीचे आहे.

बँका आणि इतर खासगी कार्यालये या ठिकाणी व्यवहारांत मुद्रणाचे महत्त्व मोठे आहे. जितके कर्मचारी तेवढे संगणक आणि जवळ जवळ तितक्याच संख्येने छपाईयंत्रे म्हणजे प्रिंटर्स, असे चित्र दिसते. प्रत्येक व्यवहार हा आधी संगणकावर आणि नंतर लगेचच छापलेल्या कागदावर!

दर वर्षी २४ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मुद्रण दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. मुद्रणकलेचा जनक योहानेस गुटेनबर्ग यांचा जन्मदिन 'जागतिक मुद्रण दिन' म्हणून साजरा केला जातो. मुद्रण कलेच्या शोधामुळेच आज आपण वैचारिकदृष्ट्या समृद्ध आहोत. आज आपण सोशल मीडिया क्षेत्रात केलेली प्रगतीही मुद्रण कलेचा उत्तम नमुना आहे.

जर्मनीतील गुटेनबर्ग यांनी अक्षराचे सुटे खिळे बनविण्याचा शोध लावला. तसेच टाईपसह छपाई यंत्राचा शोध देखील गुटेनबर्ग यांनी लावला. बायबल या ग्रंथाची छपाई करणारे देखील गुटेनबर्ग होते. इ.स. १४३४ ते १४३९ हा काळ मुद्रण क्षेत्रासाठी महत्त्वाचा काळ होता या काळातच गुटेनबर्गांनी 'धात्वलेखी मुद्रणाचा शोध लावला. उपकरणे म्हणून कागद, शाई आणि मुद्रण प्रतिमा हेच वापरण्यात येत होते. कोरीव मजकुरावर शाई लावून त्यावर ओलसर कागद ठेवून मुद्रणाचा ठसा उमटवायचे. या मुद्रणेच्या पद्धतीमध्ये खूप अडचणी आल्या. अक्षरे वाकडे दिसायचे. ह्यांचा मूळ व्यवसाय चांदीचा असून यांनी योहान फुष्ट ह्यांच्या समवेत मुद्रणाचा व्यवसाय सुरू केला.

इ.स.१४३४ ते १४३९ हा काळ मुद्रण क्षेत्रातील सर्वात महत्वाचा काळ होता. या काळात जर्मनीतील योहान गुटेनबर्ग यांनी धात्वलेखी मुद्रण नावाचा प्रकार शोधला होता. पण, हा प्रकार त्याआधी अस्तित्वात होता. असं म्हटलं जातं. मात्र, या संदर्भात कोणतेही पुरावे सापडलेले नाहीत. गुटेनबर्ग मुद्रा, मातृका आणि शिशाचा उपयोग करून ४० पानांचे बायबल छापले. गुटेनबर्ग हे जर्मनीत चांदीचे कारागीर होते. इ.स.१४५५ साली गुटेनबर्ग यांनी चल अक्षरांचा आणि मुद्रणाचा शोध लावला. त्यामुळे मुद्रण पद्धतीत लागणारा वेळ कमी झाला.

भारतामध्ये मुद्रण कला १५५६ साली आली सर्वप्रथम गोव्यात पुर्तगालमधून छापखाना जहाजाने आला. महाराष्ट्रात ही कला १८८२ साली आली अमेरिकन मिशनने मुद्रणाची सुरुवात केली या साठी त्यांनी श्रीरामपुरातून देवनागरी लिपीचे खिळे आणले या मुद्रणालयात काम करणारे टॉमस ग्रॅहम मातृका तयार करण्यास शिकले त्यांनी देवनागरी आणि गुजरातीचे सांचे बनवून मातृका तयार केल्या. त्यांच्या कडून गणपत कृष्णाजी पाटील हे अमेरिकन मिशनचे होते मातृका बनविण्यास शिकले आणि स्वतःचे मुद्रणालय १८२७ रोजी सुरू केले. पाटीलांनी चुनखडा वरून समपृष्ठ छपाई केली आणि तंत्राची निर्मिती करून पंचांगाची छपाई केली. अक्षर मुद्रणालयदेखील त्यांनी सुरू केले. मिशनरींमुळे भारतात रुजलेल्या मुद्रणकलेचा टप्प्या टप्प्याने होत गेलेला विकास, मुद्रणकलेत झालेली सांस्कृतिक स्थित्यंतरे, अक्षरजुळणीत होत गेलेले बदल आणि वाङ्मयीन आणि साहित्याच्या प्रसारासाठी त्याचा झालेला वापर, असा मुद्रणकलेचा सांस्कृतिक इतिहास आता मराठीत उपलब्ध आहे. मुद्रणकलेचे अभ्यासक अ. का. प्रियोळकर यांनी १९५८ मध्ये लिहिलेल्या 'प्रिंटिंग प्रेस इन इंडिया' या इंग्रजी पुस्तकाचा मराठीत अनुवाद करण्यात आला असून, लवकरच मराठी संशोधन मंडळाच्या वतीने हे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. मुद्रण कलेचा विकास झाल्यावर संगणकावरून कमांड देऊन मुद्रण तंत्र विकसित झाले. त्यामुळे मुद्रण कमी वेळात पूर्ण होणे शक्य झाले. . कालांतरानंतर इंटरनेटचा विकास झाला आणि मीडिया विकसित झाला. त्यामुळे आपण सहजरित्या टाईप करू शकतो.

# पर्यटकांचा जीवघेणा खेळ

माणगांव तालुक्यातील कुंभे जवळच्या चन्नाट परिसरात पावसाळ्या नंतरही उत्साही पर्यटकांचा जीवघेणा खेळ सुरूच आहे. निष्काळजीपणे येथील धोकादायक ठिकाणी वावर तसेच कुंडामध्ये उड्या मारणे अशा गोष्टी होतांना दिसत आहे. हा परिसर अत्यंत धोकादायक असून याआधी या ठिकाणी अनेक पर्यटक अडकले आहेत तर काही जणांचा जीव देखील गेला आहे. यापुढे येथे कोणतीही दुर्घटना होऊन एखाद्याचा जीव जाऊ नये यासाठी माणगांव येथील वन्यजीव अभ्यासक शंतनू कुवेसकर यांनी वनविभाग, स्थानिक प्रशासन व रेस्क्यू टीम्सचे लक्ष याकडे वेधले आहे.

पुणे आणि मुंबई सारख्या शहरातील काही पर्यटन करणाऱ्या समूहांनी परिसराची पूर्ण माहिती नसताना धोके पत्करूत या भागात सहली चालू आहेत. समाज माध्यमांवरून रील सोबत त्याच्या जाहिराती देण्यात येतात, लाखो व्ह्यूज मिळून समाजमाध्यमांवरून रील व्हायरल होत असल्याकारणाने जीवाची परवा न करता पुन्हा एकदा हा धोकादायक प्रकार सुरू झाला आहे. एखाद्या पर्यटकाचा पुन्हा एकदा येथे जीव जाण्यापूर्वीच तातडीने याला आवर घालणे आवश्यक आहे.



सध्याच्या परिस्थितीत सगळीकडे आजूबाजूला वणवे लागत आहेत. उष्णतेत प्रचंड वाढ झाली आहे. वन्य प्राण्यांचे पाण्याविना खूप हाल होत आहेत. त्यातच आता वन परिसरात प्राणी आणि पक्षांचे नैसर्गिक अधिवासात पर्यटकांचा दररोज दिवसभर उपद्रव निर्माण होऊन अडथळा निर्माण होऊन आता भर उन्हाळ्यात पाण्याविना त्यांचे हाल होण्यापूर्वी स्थानिक प्रशासन आणि वन विभागाने याकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे.

पशु-पक्षांसाठी धोका; सदर वन परिसरात डिसेंबर महिन्यापासून सर्वत्र पाणी आटून फक्त या कुंडांमध्येच पाणी शिल्लक राहते. आजूबाजूला लागणारे वणवे, उष्णतेत प्रचंड वाढ आणि अनेक प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत येथील वनपरिसरातील प्राणी व पक्ष्यांसाठी ही कुंडेच एकमेव जीवनदायी पाण्याचे स्रोत आहेत. प्रचंड जंगल परिसरातील प्राणी व पक्षी आपली तहान येथेच भागवतात. परंतु पर्यटकांचा दररोज दिवसभर उपद्रवी वावर सुरू झाल्यामुळे या राखीव वन परिसरातील प्राणी व पक्ष्यांसाठी उपद्रवी पर्यटनामुळे मोठा धोका निर्माण झाला आहे.

पावसाळ्यात व पावसानंतर चार महिन्यात सर्वत्र मुबलक पाणीपुरवठा असलेल्या परिस्थितीत सप्टेंबर ते डिसेंबर महिन्यामध्ये आम्ही येथे शाश्वत पर्यटन करवतो परंतु पर्यटकांनी आता उन्हाळ्यात येथे येऊ नये, असे आवाहन चन्नाट गावचे युवक अनिकेत कुळे, बाबु मांडवकर, दिपेश थोरे, रोहित भोसले, अमर थोरे, विपुल भोसले, सुनिल दिवळे व करंबेली ग्रामपंचायत उपसरपंच मनोहर धाडवे यांनी केले आहे.

**-संतोष सुतार, माणगाव**



## बदलते तंत्रज्ञान

# आता फक्त बोलण्यानेही होईल तुमचे युपीआय पेमेंट

सध्या अगदी एक रुपयांपासून ते एक लाखांपर्यंत कोणाला पैसे पाठवायचे असतील तरीही गूगल पे त्यासाठी आपल्याकडे २४ तास अव्हेलेबल आहे. एखादी वस्तू घेतली की व्यापाऱ्याकडून किंवा दुकानदाराकडे स्कॅनर मागून, मोबाइलमधील गूगल पे ॲप उघडून स्कॅनरच्या मदतीने पेमेंट करून टाकायचे, पण अनेकदा हे करताना अमाऊंट (किंमत)च्या जागी चुकून पिन टाकला जातो आणि घोळही होऊ शकतो. तर आता अशा चुका होऊ नये म्हणून की काय गूगल पे आपल्या सगळ्यांसाठीच खास फीचर घेऊन येतो आहे.



गूगल पे युजर्स एआय फीचर्सचा लाभ घेण्यासाठी तयार आहेत. आता फक्त बोलून यूपीआय पेमेंट करता येणार आहे, असे सांगितले जात आहे.

भारतातील गुगल पे चे प्रमुख उत्पादन व्यवस्थापक, शरथ बुलुसु यांनी सांगितले की, हे व्हॉइस फीचर ॲपद्वारे डिजिटल पेमेंट करण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुलभ करेल. पण, या फीचर्सबद्दलची माहिती सध्या मर्यादित आहे. पण, तरीही व्यवहारांसाठी यूपीआयवर अवलंबून राहणाऱ्या सर्वांसाठी हा अपडेट वा फीचर गेमचेंजर ठरू शकतो.


### व्हॉईस फीचर

गूगल पेमध्ये व्हॉईस कमांड्स सुरू केल्यामुळे जे अशिक्षित आहेत त्यांनाही ऑनलाइन पेमेंट करणे अधिक सोपे होईल. कारण फक्त बोललेल्या सूचनांद्वारे व्यवहार हाताळायचा असणार आहे. म्हणूनच ट्रान्सफॉर्मेटिव्ह व्हॉईस फीचर लवकरच लाँच केले जाईल, कारण गुगल पे ने स्थानिक भाषांमध्ये पेमेंट फॅसिलिटी सुलभ करण्याच्या उद्देशाने भारत सरकारबरोबर सहयोग केला आहे.

या व्यतिरिक्त, भारतात सायबर फसवणुकीचा सामना करण्यासाठी गूगल मशीन लर्निंग आणि एआय तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करत आहे, त्यामुळे हे फीचर वा अपडेट ग्राहकांना ऑनलाइन घोटाळे आणि धोक्यांपासून सुरक्षित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल.

भारतातील विस्तीर्ण ऑनलाइन बाजारपेठ पाहता, गुगल पे या क्षेत्रात नावीन्य आणण्यास उत्सुक आहे, कारण देशात गुगल पे ने व्यवहार करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यांना ॲप नवनव्या सुविधा देत आहे.

# प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ जे.पी. नाईक



## निमित्त

प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ज्ञ व पद्मभूषण पुरस्काराचे मानकरी. जे.पी. नाईक यांना भारतातील नवीन शैक्षणिक पद्धतीचे जनक आणि शिल्पकार म्हटले जाते. त्यांचा जन्म बहिरेवाडी (ता. आजरा, जि. कोल्हापूर) या दुर्गम खेड्यात झाला. त्यांचे मूळनाव विठ्ठल हरी घोटगे होय. त्यांच्यावर महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव होता. असहकार आंदोलनात भूमिगत असताना इंग्रजाना चकवा देण्याच्या हेतूने नाईक यांनी विठ्ठल हरी घोटगे हे नाव बदलून जयंत पांडूरंग नाईक म्हणजेच जे. पी. नाईक हे नाव धारण केले व याच नावाने ते जगभर प्रसिद्ध झाले.


नाईक यांचे शालेय शिक्षण कानडी भाषेतून बेळगावीजवळील बेलहोंगल येथे, तर माध्यमिक शिक्षण बेळगावी येथे झाले. प्राथमिक शिक्षण घेताना कौटुंबिक दारिद्र्य व गरीबीमुळे त्यांना अनंत अडचणी आल्या. देशभक्तीने प्रेरित झालेल्या नाईक यांनी सरकारी नोकरी सोडून इंग्रजविरोधी असहकार आंदोलनात हिरीरीने सहभाग घेतला. त्या वेळी बेल्लारीच्या तुरुंगवासात त्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या मदतीने वैद्यकशास्त्र या विषयाचा अभ्यास करून तेथील रुग्णांची सेवा केली. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर गरीब जनतेसाठी त्यांनी स्वस्त औषधोपचाराचा दवाखाना काढून मोफत रुग्णसेवा केली. 'अनारोग्यामुळे दारिद्र्य आणि दारिद्र्यामुळे अनारोग्य या दुष्टचक्राचा भेद झाला पाहिजे', असे नाईक म्हणत. बालकांचे कुपोषण, बालमृत्युंचे प्रमाण व मातांच्या मृत्युंचे प्रमाण यांमुळे ते अस्वस्थ होते. त्यांनी सर्वांसाठी 'कॉमन स्कूल' ही संकल्पना आपल्या विचारातून मांडली. प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे असले पाहिजे, असे ते म्हणत. स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा समावेश असलेली शिक्षणव्यवस्था त्यांना अभिप्रेत होती. भारत सरकारच्या शिक्षण खात्याद्वारा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद त्यांनी स्थापन केली. नाईक यांनी भारत सरकार व युनेस्को यांच्या माध्यमातून १९६२ मध्ये एशियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशनल प्लॅनिंग अँड डमिनिस्ट्रेशन ही संस्था दिल्ली येथे स्थापन करण्यात पुढाकार घेतला. आशिया खंडातील प्राथमिक शिक्षणाचा नियोजनबद्ध विकास करण्यामध्ये ही संस्था मोलाची ठरली. नाईक यांनी प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, हस्तपुस्तिका, सेवापूर्व व सेवातंर्गत शिक्षक प्रशिक्षणासाठी साहित्य निर्मिती केली. नाईक यांचे कार्य पाहून युनेस्कोने त्यांना आपले विचार मांडण्यासाठी १९५२ मध्ये निमंत्रित केले. नाईक यांचे भारतीय व जागतिक शिक्षण क्षेत्रातील योगदान अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना पद्मभूषण (१९७४) हा सन्मान बहाल केला. अखबारनवीस हे मानाचे पारितोषिक त्यांना मिळाले. त्यांच्या नावे शासनाने पोस्ट तिकीट काढले, भारतीयांना अभिमान वाटण्यासारखी बाब म्हणजे युनेस्कोच्या २,५०० वर्षांतील १०० निवडक जागतिक शैक्षणिक विचारवंतांच्या 'थिंकर्स ऑन एज्युकेशन' या अहवालात भारतातील महात्मा गांधी व रविंद्रनाथ टागोर यांच्यासोबत नाईक यांचा समावेश आहे. नाईक यांचे २४ फेब्रुवारी २०११ मध्ये पुणे येथे निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तुमचे तळपाय सांगतात आरोग्याचे रहस्य



डोळ्यांपासून ते पायांपर्यंत शरीराचा प्रत्येक अवयव खूप महत्त्वाचा असतो. तसेच तुमचे तळपाय तुमच्या आरोग्याबद्दल बरेच काही सांगू शकतात आणि त्वरित लक्ष देण्याची आवश्यकता असलेल्या आरोग्य समस्यांकडे संकेत देऊ शकतात.

यावर सविस्तरपणे बोलताना, आहारतज्ज्ञ निधी गुप्ता यांनी इन्स्टाग्रामवर सामान्य आरोग्य समस्या शेअर केल्या, ज्याची पहिली लक्षणे पायांवर दिसतात असे त्यांचे मत होते. याच्याशी सहमती दर्शवत, परळ, मुंबई येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक्सचे वरिष्ठ सल्लागार डॉ. अनुप खत्री म्हणाले की, या समस्येमागील मूळ कारणांचे मूल्यांकन करणे आणि नंतर वेळेवर उपचार सुरू करणे ही काळाची गरज आहे. आहाराकडे लक्ष देणे आणि डॉक्टरांनी दिलेल्या उपचार मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, असे डॉ. खत्री म्हणाले.

### काही सामान्य संकेत असे आहेत

**सूज :** पायांना सूज येणे हे मूत्रपिंडाचे कार्य कमी असणे, हृदयरोग, यकृताचे आजार किंवा गर्भधारणा दर्शवू शकते. संधिवात आणि व्हिटॅमिन-डीच्या कमतरतेमुळे घोट्यात वेदना होऊ शकतात, असे डॉ. अनुप खत्री म्हणाले.

**स्पायडर व्हेन्स :** हे बहुतेकदा उच्च इस्ट्रोजेन पातळी, गर्भनिरोधक गोळ्या किंवा गर्भधारणेशी जोडलेले असते. जर तुम्हीही हे अनुभवत असाल तर तुमच्या डॉक्टरांशी चर्चा करणे गरजेचे आहे, असे गुप्ता म्हणाल्या.

**पायांना भेगा :** व्हिटॅमिन बी २ (रिबोफ्लेविन), बी ३ (नियासीनामाइड) आणि ओमेगा-३ च्या कमतरतेचे हे एक सामान्य लक्षण आहे. पूरक आहाराद्वारे या व्हिटॅमिनचे पुरेसे सेवन केल्याने त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते, असे गुप्ता म्हणाल्या.

डॉ. खत्री म्हणाले की, व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता मज्ञातंतूंशी संबंधित अस्वस्थता आणि मुंग्या येणे याद्वारे निर्माण होऊ शकते. तसेच फॅटी ॲसिडचे, विशेषतः ओमेगा-३ चे अपुरे सेवन हे निरोगी फॅट्स त्वचेची लवचिकता आणि हायड्रेशन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

# रामदास पठार पर्यटन विकासाची प्रेरणा रामदासस्वामी, अरविंदनाथ महाराजांकडून

## ◆ मंत्री भरत गोगावले यांचे उद्गार; धार्मिक सोहळ्यात सहभाग



**पोलादपूर : प्रतिनिधी**

समर्थ रामदास स्वामी यांचे वास्तव्य असलेल्या रामदास पठारावरील पर्यटन विकासासाठी गेल्या अनेक वर्षापासून समर्थ रामदास स्वामी आणि सद्गुरु अरविंदनाथ महाराज यांच्यापासून प्रेरणा मिळत आली असून रामदास पठारावर शासकीय विश्रामगृहासह सर्व सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील राहीन, अशी स्पष्टोक्ती मंत्री ना.भरतशेठ गोगावले यांनी जाहिररित्या व्यक्त केली.

श्रीक्षेत्र रामदास पठार येथे श्रीरामदास नवमीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड श्रीमददासबोध पारायणानंतरच्या काल्याच्या किर्तन समारोप सोहळ्याप्रसंगी मंत्री गोगावले बोलत होते. यावेळी त्यांनी काल्याची हंडी फोडली. यानंतर त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि श्रीरामदास स्वामी यांच्या शिवसमर्थ भेटीच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी सद्गुरू श्रीअरविंदनाथ महाराज, स्थानिक जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर तसेच श्रीगणेशनाथ महाराज संस्थानाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री गोगावले यांनी, सर्वसामान्य जनता आणि सद्गुरू आणि छत्रपती शिवाजी महाराज तसेच समर्थांचे आशीर्वाद यामुळेच आज चौथ्यांदा आमदार आणि मंत्रीदेखील झालो आहे. ज्याप्रमाणे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या उमरठचा पर्यटन विकास करण्यासाठी कोटयवधींचा निधी उपलब्ध करून घेतला. श्रीक्षेत्र रामदास पठार येथे त्यापेक्षा अधिक निधी उपलब्ध करून देणे ही सद्गुरू अरविंदनाथ महाराजांचा शिष्य म्हणून नैतिक जबाबदारी मानतो, असे नम्रपणे सांगितले.

या ठिकाणी पारमाची ते रामदास पठार आणि वरंध कुंभार कोंड ते रामदास पठार असे दोन्ही बाजूंनी रस्ते करुन विकास कामे करणार असून याबदल्यात आम्ही फक्त पाच वर्षांनी आशीर्वाद मागतोय आणि जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायतीला मतदानाची अपेक्षा करतोय. सेवेची संधी दिली तर कामे मार्गी लागतील यात शंका बाळगण्याचे कारण नसल्याचे सांगितले .

# माथेरानमध्ये भीषण आग, वनसंपदेची हानी

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहराच्या मध्यभागी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाशेजारील असलेल्या एका खाजगी बंगल्यातील आवारात भीषण आग लागली.

आग भीषण असल्याने अग्निशमक कर्मचारी वर्गाला आग आटोक्यात आणण्यासाठी तासाहून अधिक वेळ लागला.माथेरान शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एक खाजगी बंगला आहे.हा बंगला फार जुना असून सध्या स्थितीत पडीक असल्याने येथे कोणी राहत नाही.सर्वत्र कचरा आणि मोडकी लाकडे पडलेली आहेत.याठिकाणी

दि.२२ रोजी सायंकाळी आग लागल्याची घटना घडली.समोरच्या दुकादारांनी पालिका कर्मचाऱ्यांना संपर्क केला.काही वेळातच आगीचा बंब घटनास्थळी दाखल झाला.हा बंगला पडीक असून आणि याठिकाणी कोणीही राहत नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला मात्र आसपासच्या वनसंपदेचे मोठे नुकसान झाले आहे.परिसरातील झाडेझुडपे जळून बेचिराख झाली आहेत.बंगल्याच्या आवारात जुनी सुखी लाकडे पडली असल्याने आगीने रौद्र रूप घेतले होते.

माथेरान पर्यटनस्थळी असलेल्या एकमेव बंबाने ही आग आटोक्यात आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.यावेळी बंब चालक अजिंक्य सुतार तसेच सह्याद्री रेस्क्यू टीम सदस्य आणि माथेरान नागरीकांनी मोठी मदत केली.



# श्रीवर्धनचे ऐतिहासिक सार्वजनिक वाचनालय, सव्वाशतक समाजप्रबोधनाचे कार्य

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनमधील सार्वजनिक वाचनालय हा एक ऐतिहासिक ठसा असलेला संस्थात्मक प्रकल्प आहे, ज्याने गेल्या सव्वाशकात वाचनाची आणि समाजप्रबोधनाची कार्ये हाती घेतली आहेत. १८९३ मध्ये नगर परिषदेतर्फे सुरु झालेले हे वाचनालय आज १३१ वर्षांची वाचनपरंपरा जपते आणि त्याचसोबत सामाजिक चळवळीला चालना देत आहे. वाचनालयाची स्थापना जंजिरा संस्थानाच्या सहकार्याने झाली आणि आजही ते वाचनालयाच्या कामकाजात एक महत्त्वपूर्ण स्थान राखते.



वाचनालयाच्या प्रारंभिक काळात केवळ नगर परिषदेकडून कारकून म्हणून नियुक्त ग्रंथपाल याचे संचालन करीत होते. त्यावेळी वाचनालयाचे कार्य अगदी मर्यादित होते आणि ते एका भाड्याच्या घरात सुरू होते. कालांतराने जंजिरा संस्थानाच्या सहकार्याने वाचनालयासाठी ४३९ रुपयांची जागा दिली आणि सागवानी कपाटांसारखी वस्तुही भेट देण्यात आली. त्यानंतर १९४२ मध्ये वाचनालयासाठी स्वतंत्र इमारतीचा निर्माण सोडून देण्यात आला, ज्यावर अंदाजे ४,००० रुपये खर्च झाले होते.

१९५३ मध्ये वाचनालयाने स्वतंत्र संस्था म्हणून अस्तित्व स्वीकारले आणि त्याच्या कार्यातील विस्तारासाठी अनेक सन्माननीय व्यक्तींनी त्याची कार्यकारिणी निवडली. १९६४ मध्ये वाचनालयाला सरकारी अनुदान मिळण्यास सुरुवात झाली. त्यानंतर हळूहळू वाचनालयाच्या अनुदानामध्ये वाढ होऊ लागली आणि आज वाचनालयाला ६,१४,४०० रुपये वार्षिक अनुदान प्राप्त होत आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात वाचनालयाने पुढाकार घेतला आणि १९८९ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या बहिष्कृत शिक्षण केंद्राचे कार्य सुरू केले. या केंद्राला अनेक विदयार्थी आणि प्रसिद्ध व्यक्तींनी भेट दिली आहे. वाचनालयाच्या पुस्तकसंख्येत १९५५ मध्ये ७,७८८ पुस्तके असताना आज ती संख्या ३९,३६५ वर पोहोचली आहे. त्याचप्रमाणे, वाचनालयात २२ दैनिके, सात साप्ताहिके, एक पाक्षिक आणि ४२ मासिके देखील उपलब्ध आहेत.

वाचनालयाच्या कार्याचे महत्त्व अधिक वाढले आहे, कारण त्यात स्पर्धा परीक्षा विभागही आहे. २००६ मध्ये महाराष्ट्र शासनाने वाचनालयाला विशेष सन्मानपत्र दिले आणि पाच लाख रुपयांचा निधी वाचनालयाला मिळाला. यामुळे वाचनालयात टीव्ही, डीव्हीडी प्लेअर, कपाटे इत्यादी आधुनिक सुविधांचा समावेश करण्यात आला.

वाचनालयाने समाजातील सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्राला सशक्त बनविण्यासाठी अनेक कार्यक्रम आणि शिबिरे आयोजित केली आहेत. शारदोत्सव, शिबिरे, तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून वाचनालयाने श्रीवर्धनमधील सांस्कृतिक जीवनास समृद्ध केले आहे. त्याचप्रमाणे, वाचनालयाच्या इमारतीत विविध प्रकारचे समाजसेवी आणि शैक्षणिक कार्यदेखील चालू आहेत.

आज वाचनालय हे केवळ वाचनाचे केंद्र नाही, तर एक सामूहिक विचारविनिमय आणि शैक्षणिक प्रसाराचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. श्रीवर्धनमधील या वाचनालयाच्या शंभराहून अधिक वर्षांच्या प्रवासाने समाजप्रबोधनाच्या कार्यात प्रगती साधली आहे आणि भविष्यातही त्याची वाचनपरंपरा आणि सामाजिक कार्य अधिक सशक्त होईल, अशी आशा आहे.

### ▪ वाचनाची आवड वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य

*श्रीवर्धन येथील सार्वजनिक वाचनालयाला १३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. या दीर्घकालीन वाचनालयाने विविध वाचनसाधनांचा संग्रह करून स्थानिक वाचकांना ज्ञानाचे एक महत्त्वाचे केंद्र दिले आहे. वाचनालयात ३९,३६५ पुस्तकांचा समृद्ध खजिना उपलब्ध आहे, जो विविध शास्त्र, साहित्य, कला आणि इतिहासाचे अंबार असलेल्या पुस्तकांची निवडक सामग्री प्रस्तुत करतो. याशिवाय, वाचनालयात २२ दैनिके, ७ साप्ताहिके, १ पाक्षिक आणि ४२ मासिके देखील वाचकांसाठी उपलब्ध आहेत. विविध प्रकारच्या साहित्याने हे वाचनालय वाचनाची आवड वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार करत आहे. वाचनालयाने सदैव लोकांच्या शिक्षण व सर्वांगीण विकासासाठी आपली भूमिका प्रभावीपणे बजावली आहे.*

# खोपोलीत आरोग्य तपासणी शिबिर



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद वैद्यकीय व आरोग्य विभाग आणि तेजस्विनी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात करण्यात आले होते.यावेळी विविध बचतगटाच्या महिलांनी खोपोली नगरपालिका डॉक्टर, टाटा हॉस्पिटलचे व एमजीएम हॉस्पिटल स्त्रीरोग तज्ञ डॉक्टारांनी सर्व महिलांची आरोग्य तपासणी केली.

आरोग्य शिबाराचे उद्घाटन एमजीएम हॉस्पिटल स्त्रीरोग तज्ञ डॉ. सुनिला संजीव,टाटा हॉस्पिटलच्या डॉ.प्रतिभा पाटील,खोपोली नगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.संगीता ठाकूर-वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले.सविता जाधव आणि जयश्री मिंडे यांनी दीपप्रज्वलन केले.याप्रसंगी श्वेता बाराथे, इंचार्ज सिस्टर गिरी उपस्थित होत्या.

टाटा हॉस्पिटल, एमजीएम हॉस्पिटल तज्ञ डॉक्टारांनी महिलांची कॅन्सरपूर्व मुख, स्तन व गर्भाशयमुख तपासणी केली.एमजीएम हॉस्पिटल स्त्रीरोग तज्ञ डॉक्टारांनी कान नाक घसा तज्ञ व भिषक यांनी सर्व महिलांची आरोग्य तपासणी केली. महिलासांठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यासाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.पंकज पाटील, उपमुख्याधिकारी रणजित पवारयांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# मोरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची औद्योगिक क्षेत्रभेट

**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाउंडेशनचे महिला महाविद्यालय, धाटाव येथील रासायनशास्त्र विभागामार्फत शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत एमआयडीसी- रोहा येथील हुबेक कोलोरंट इंडिया लि. या कंपनीमध्ये २२ फेब्रुवारी रोजी क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.



यावेळी सर्वप्रथम विद्यार्थिनींना सुरक्षेचे सर्व नियम समजावण्यात आले आणि कंपनीकडून विद्यार्थिनींना पीपीई किट परिधान करण्यास देण्यात आले. त्यानंतर कंपनीचे अधिकारी पराग फुकणे व डॉ. शैलेश नकटे यांनी साइट ब्रीफिंग केले. विद्यार्थिनींची सुरक्षा लक्षात घेऊन त्यांची दोन गटांत विभागणी करून साइट राऊंडवर नेण्यात आले.

यादरम्यान वेअर हाऊस, पॉवर हाऊस, सेंट्रल वर्कशॉप, एक्सप्लांट, थद्धझ प्लांट, लॅब आणि ॲडमिनीस्ट्रेशन ऑफिस आदीबाबत संपूर्ण माहिती विद्यार्थिनींनी घेतली. या भेटीबाबत काही विद्यार्थिनींनी आपला अभिप्रायदेखील व्यक्त केला. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर यांनी कंपनी व अधिकाऱ्यांचे आभार मानले.

या क्षेत्रभेटीचे नियोजन शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स कमिटीच्या प्रमुख प्रा. शिल्पा खाडे आणि रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर यांनी केले. टि.वाय, बीएससी वर्गातील ४० विद्यार्थिनी आणि रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. ममता बिंद, प्रा. पूनम जोशी, प्रा. जुईली देशमुख यांनी क्षेत्रभेटीत सहभाग घेतला.

# सुधागड तालुक्यातील शिक्षकांना क्षमतावृद्धी २.० प्रशिक्षणाचे धडे

**पाली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत सुधागड तालुक्यातील इयत्ता पहिली ते बारावीच्या वर्गाना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे शिक्षक क्षमता वृध्दी प्रशिक्षण २.० प्रशिक्षण पंचायत समिती शिक्षण विभाग पाली आयोजित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे आणि वरिष्ठ विस्तार अधिकारी साबळे यांच्या मार्गदर्शन खाली पहिल्या टप्प्यात चिवे आश्रमशाळा येथे १७ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न झाले

शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणासाठी प्राथमिक विभागाचे सुलभक म्हणून गोरख आघाव, आनंदा पाटील, जयेश साजेकर, आदिनाथ फुंदे, राकेश गदमले, संजय थळे, राजेश गायकवाड, इंगळे , अमोल ठोकल तर माध्यमिक विभागातून मंदार सिनकर ,विक्रम काटकर , नागथाने , जनार्दन भिलारे, गिते ,तृप्ती मराठे यांनी आपल्या अनुभवातून व मिळालेल्या ज्ञानातून प्रशिक्षण देत आहेत.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू झाले असून शालेय शिक्षण स्तरासाठी ५+३+३+४ असे दोन स्वतंत्र राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडे प्रसिद्ध करण्यात आले आहेत.त्यानुसार राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत सन २०२३ व शालेय शिक्षण २०२४ मध्ये शिक्षणाची लक्ष्य ,ध्येये, क्षमता, अध्ययन निष्पत्ती , पंचकोश विकास अशा विविध संकल्पना या प्रशिक्षणातून स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

प्रत्येक मुल शिकलं पाहिजे, त्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे,विद्यार्थ्यांच्या कौशल्य शिक्षणास प्रोत्साहन दिले पाहिजे,घोकंपट्टी आधारित शिक्षण कमी करण्यासाठी व कृती वर आधारित अध्यापनशास्त्रात बदल घडवण्यासाठी सर्व शिक्षकांनी सक्षम होणे आवश्यक आहे.नवीन बदल स्वतःमध्ये आत्मसात करून दैनंदिन अध्ययन अध्यापनात नवनवीन डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा , शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची प्रगती ३६० अंश डिग्री मध्ये अहवाल तयार करणे तसेच शालेय स्तर तर्क रचना, पंचकोश विकास भारतीय परंपरेचा पाया यावर आधारित सखोल मार्गदर्शन सर्व सुलभ करत आहेत .

शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण वर्गाला सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी भेट देऊन सर्व वर्गात जाऊन आढावा घेऊन तालुक्याच्या गुणवत्ता विकासाबाबत सर्व शिक्षकासोबत हितगुज साधले व प्रशिक्षण वर्गास शुभेच्छा दिल्या.

# भयग्रस्त नागरिकांना प्रशासनाकडून धीर

**पाली: प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील या गावांमध्ये बुधवारी रात्री १० वा मध्यरात्री व गुरुवारी (ता. २०) पहाटे ५ वाजताच्या दरम्यान भूगर्भातून आवाज येवून जमिन हादरली. पेण तालुक्यातील काही गावांना देखील धरणीकंप झाला यामुळे भयभीत झालेल्या नागरिकांची प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टीने जनजागृती करण्यात आली. या संदर्भात भूवैज्ञानिकांना स्थळपाहणी करण्याची विनंती करण्यात आली आहे.

प्रशासनाकडून नागरिकांना सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नागरिकांनी भयभीत न होता सतर्क राहुन स्थानिक प्रशासनास सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली. भूर्गर्भातून येणारे आवाज व धक्के याबाबत भूवैज्ञानिक यांना स्थळपाहणी करण्याची विनंती प्रशासनाकडून करण्यात आल्याची माहिती नागरिकांना देण्यात आली.

यावेळी उपविभागीय अधिकारी सुधागड सायली ठाकूर, तहसीलदार सुधागड उत्तम कुंभार, निवासी नायब तहसीलदार भारत फुलपगारे, सुधागड, उपसरपंच महागाव भास्कर पार्टे, नैसर्गिक आपत्ती मार्गदर्शक मनोहर म्हात्रे, मंडळ अधिकारी पेडली अंकुश साळवे व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

सदर घटनेची माहिती मिळताच या ठिकाणी तहसिलदार, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थानिकांची भेट घेवून जागेची पाहणी केली असता कोणतीही जिवीतहानी झालेली नसल्याचे दिसून आले.

तहसीलदार उत्तम कुंभार यांनी नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून सदर ठिकाणाचे भूवैज्ञानिक तज्ञांकडून पाहणी करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयास तात्काळ अहवाल सादर केला. पुढील अहवालात काय निष्पन्न होईल याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost in lakhs |
|---|---|---|
| Tend-61/24-25 RFX 700035381 | Overhauling of 145KV AREVA MAKE CB at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 30.67 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 21.02.2025 to 10.03.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 10.03.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost in lakhs |
|---|---|---|
| Tend-65/24-25 RFX 700035390 | Supply of various general asset material required at various locations under EHV (O&M) Circle, Panvel for the F.Y. 2024-2025 | Rs. 9.26 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 21.02.2025 to 10.03.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 10.03.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/- + GST** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# नव्या बांधकामांच्या ठिकाणी सीसीटीव्ही बंधनकारक

## नवी मुंबई मनपा क्षेत्रासाठी नियमावली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील पुर्नविकास तसेच नव्या इमारतींच्या बांधकामांच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. पालिकेने निश्चित केलेल्या बांधकाम नियमावलींचे काटेकोर पालन होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी मानक प्रणालीचे पालन न करणाऱ्या ८७ व्यावसायिकांवर पालिकेने कारवाईचा दट्ट्या लावत सुमारे १.१७ कोटींचा दंड वसुल केला होता.

दंड आकारल्यानंतरही बांधकामाच्या ठिकाणी नियमावलींचा भंग होत असल्याने आता सीसीटीव्हींद्वारे नजर ठेवण्यात येणार असून या सीसीटीव्हींची तपासणी पालिकेच्या अधिकाऱ्यांना करता येणार असल्याची माहिती पालिकेच्या नगररचना विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

शहरात सुरू असलेल्या बांधकाम नियमावलीबाबत बांधकाम व्यावसायिकाकडून सातत्याने नियमावलींचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने पालिकेने बांधकाम व्यावसायिकांवर कठोर कारवाई केली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करून घेतलेल्या सुमोटो याचिकेनुसार तसेच ११ डिसेंबर २०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, वायु



व ध्वनी प्रदूषण कमी करण्याबाबत आदेशित केलेले होते. त्यानुसार तसेच शहरातील ध्वनी, वायू प्रदूषण त्याचप्रमाणे रात्री अपरात्री ब्लास्टींगच्या अनुषंगाने नागरिकांकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे सातत्याने तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याबाबत नागरिकांनी स्थानिक पोलीस ठाण्यातही तक्रारी केल्या होत्या.

पालिकेने बांधकामाबाबत १९ जून रोजीच बांधकामाबाबत 'मानक कार्यप्रणाली' तयार केली होती, परंतु पालिकेच्या मानक कार्यप्रणालीची बांधकाम व्यावसायिकांडून पायमल्ली होत आहे. पालिकेने सर्वच आठ विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी ८७ ठिकाणांची स्थळ पाहणी केली होती. त्यानुसार नियमावलींचा भंग करणाऱ्यांवर पालिकेने कारवाई केली आहे. तसेच पालिकेने कोट्यवधी रुपयांची दंडात्मक रक्कम वसूल केल्यानंतरही नियमावलींचा भंग होत आहे. त्यामुळे पालिकेने आता बांधकामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा लावण्याचे निर्देश सर्व बांधकाम व्यावसायिकांना दिले आहेत.

**बांधकामाबाबत मानक नियमावलींचा भंग करणाऱ्या विकासकांवर पालिकेने दंडात्मक कारवाई करूनही बांधकामांबाबतच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे पालिकेने आता बांधकामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा लावण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच संबंधित कामाच्या ठिकाणचे सीसीटीव्ही तपासण्याची मुभा पालिका अधिकाऱ्यांना असणार आहेत. त्यामुळे अधिक पारदर्शकता येणार असून नियमावलींचा भंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करता येणार आहे.**
**–सोमनाथ केकाण, सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महापालिका**

# घर विक्रीच्या बहाण्याने चौघांना १३ लाखांचा गंडा

**नवी मुंबई : बातमीदार**

पावणे गावातील एका बांधकाम प्रकल्पातील घरे विकण्याच्या बहाण्याने एका विकासकाने तिघांची १३ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी विकासक ऋषी बजरंग मोकल याच्या विरोधात तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोकल याने पावणे गावात फिफ्टी फिफ्टी तत्त्वावर निवासी इमारत बांधली आहे. या इमारतीत तक्रार वैशाली अनिल जाधव यांनी घर बुक केले होते. मोकल याच्या भूलथापांना बळी पडून त्यांनी घराच्या नोंदणीपोटी जानेवारी २०२२पासून आतापर्यंत दोन लाख २५ हजार रुपये दिले होते. त्यांना घरही निश्चित करण्यात आले, मात्र प्रत्यक्ष ताबा देण्याच्या वेळी ते घर दुसऱ्याच कोणाला तरी विकल्याचे जाधव यांच्या लक्षात आले. घर देण्याच्या बहाण्याने १३ लाख २५ हजार रुपये उकळल्याचे संबंधितांनी दिलेल्या तक्रारीवरून स्पष्ट झाले आहे. प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात विकासक ऋषभ मोकल याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

विकासक मोकल याच्याकडे पैशांसाठी तगादा लावला, परंतु मोकल याने कोणताही प्रतिसाद न दिल्याने अखेर शनिवारी त्याच्याविरोधात फसवणुकीची तक्रार दाखल केली.

# राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थेचा वार्षिकोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**



राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, सिकंद्राबाद यांच्या खारघर, नवी मुंबई येथील क्षेत्रीय केंद्रात संस्थेचा ४१ वा वार्षिकोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी रोटरी क्लब खारघर यांच्या सौजन्याने ध्वनी संगीत प्रयोगशाळेचे (म्युझिक लॅब) उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ रवी प्रकाश सिंग, दिनेश मेहता, संजय पाणिग्रही,रचना त्रिवेदी, रणधीर कुमार ठाकूर, जगन मुदगडे हे उपस्थित होते.संस्थेचे प्रमुख प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. या वर्धापनदिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी ध्वनी संगीत प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. रोटरी क्लब खारघर यांच्या सौजन्याने बनविण्यात आलेल्या ध्वनी संगीत प्रयोगशाळेचे उद्घाटन मुख्य पाहुणे दिनेश मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रयोगशाळेद्वारे विशेष गरजा असलेल्या मुलांना संगीताच्या माध्यमातून आत्मविश्वास आणि कलागुण विकसित करण्यासाठी मदत मिळेल.

दिव्यांग विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, पालक आणि कर्मचारी वर्ग यांनी नृत्य, गायन, वेशभूषा आणि नाटक सादरीकरणाद्वारे आपले कलागुण सादर केले. पाहुण्यांनी या सर्व सादरीकरणांना भरभरून दाद दिली. वार्षिक क्रीडासंमेलनात विजयी ठरलेल्या दिव्यांग विद्यार्थी आणि प्रशिक्षणार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी संगीतामुळे दिव्यांग मुलांच्या विकास महत्त्व, केंद्र शासनाच्या योजना आणि संस्थेच्या भविष्यातील योजनांबद्दल माहिती सांगितली.

संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी सर्व पाहुणे, विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, पालक आणि कर्मचारी वर्ग यांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी संस्थेच्या सर्व कर्मचारी वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे समन्वयन किरण बिनकर आणि ज्योती खरात यांनी केले.

# बेलापूर विभागातील अतिक्रमण निष्कासित

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

घर क्र. ३३४/०००४, करावे गांव, से.३६ नवी मुंबई, यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत MRTP कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते, परंतु त्यांनी ते सुरू ठेवले होते.

अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करून सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे. या धडक मोहिमेसाठी डॉ. अमोल पालवे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी आत्माराम काळे, कनिष्ठ अभियंता तसेच बेलापूर विभागातील अधिकारी/कर्मचारी, मजूर दहा, हॅमर तीन, गॅसकटर एक तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस तैनात होते.

तसेच यापुढेदेखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.



# शांतीवन येथे श्रमसंस्कार शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराने समाजसेवेचा अनोखा आदर्श उभा केला.

१५ ते २१ फेब्रुवारी २०२५ दरम्यान शांतीवन येथे पार पडलेल्या या शिबिरात स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, जनजागृती कार्यक्रम, पथनाट्य आणि शैक्षणिक मदत असे समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.कल्पेश भोईर हे अध्यक्षस्थानी होते तसेच वाकडी गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि शांतीवन संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या सात दिवसांत योगा, श्रमदान, बौद्धिक व्याख्याने, चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृत केली.

शिबिराचा समारोप २१ फेब्रुवारी रोजी प्रा. मयुरी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त करत या शिबिराने त्यांच्यातील नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव अधिक दृढ केला असे सांगितले. या यशस्वी उपक्रमाचे संपूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत मुकादम व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. या शिबिरात प्रा. के.डी. शारा, प्रा. प्रशांत पाटील, प्रा.अंजू सोंखला आणि महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

हे शिबिर म्हणजे समाजासाठी योगदान देण्याची उत्तम संधी ठरली असून, यातून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थी भविष्यातही समाजसेवेच्या कार्यात सहभागी होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. सूत्रसंचालन प्रीती तांडेल तर निखिल डोलारे याने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# तुर्भेत अनधिकृत हॉटेल, बार व लॉजचा सुळसुळाट

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे सेक्टर १९ हा परिसरात एपीएमसी मार्केट संबंधित गतिविधींना जागेअभावी त्रास होऊ नये यासाठी वेअर हाऊससाठी भुखंड उपलब्ध करून देण्यात आले आहेत, परंतु गेले काही वर्षे भुखंड धारकांनी जास्तीचे पैसे कमवण्यासाठी या वेअर हाऊसच्या भुखंडांवर हॉटेल, बार व लॉज उभारण्यास सुरुवात केली.

परिणामी आज मोठ्या संख्येने या परिसरात हॉटेल, बार व लॉज चे जाळे पसरले आहे. नवी मुंबई विकास अधिष्ठानचे अध्यक्ष संकेत डोके यांनी सेक्टर १९ ई येथील अनधिकृत बांधकाम केलेल्या हॉटेल, बार व लॉज चालकांची यादी आयुक्त व विभाग अधिकारी यांना निवेदन देऊन दिली आहे.

यातील अनेक बार व लॉजमध्ये अनेक वेळा एपीएमसी पोलिसांकडून अनैतिक धंदे होत असल्याचे निदर्शनास आल्यावर कारवाई झालेली आहे. तसेच तत्कालीन उपायुक्त राहुल गेठे यांनी त्यांचा अतिक्रमण विभागाचा पदभार स्वीकारल्यावर पहिली कारवाई या अनधिकृत हॉटेल, बार व लॉज वर केली होती. काही महिन्यांतच पुन्हा मोठ्या ताकदीने हे हॉटेल, बार व लॉज सुरू आहेत. मुळात महापालिकेचे आरक्षित वेअर हाऊस वापरासाठी असेलेल्या भुखंडावर नियमानुसार वापर बदल न करता सुरू असलेले हे हॉटेल, बार व लॉज कसे कार्यरत आहेत. हा सवाल नागरिकांच्या मनात उपस्थित झालेला आहे.

या घटकांकडून सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायांकडे महापालिकेने लक्ष देण्याची मागणी होत आहे. या व्यवसायिकांनी नियमबाह्य पद्धतीने केलेले अतिक्रमण भविष्यात एखादी दुर्दैवी घटना घडवू शकते.

# वाशी येथील भाजप कार्यालयात सुसंवाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे यांच्या वाशी येथील जनसंपर्क कार्यालयात भारतीय जनता पक्षाच्या वाशी विभागातील शक्ती केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख, मंडळ पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्ते यांच्याशी बेलापूर विधानसभा संयोजक माजी नगरसेवक निलेश मंदा म्हात्रे यांनी सुसंवाद साधत सदस्य नोंदणी अभियानाबाबत मार्गदर्शन केले.

या ठिकाणी बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे यांनी झालेल्या सदस्य नोंदणी अभियान आणि कार्यकर्ता सुसंवाद कार्यक्रमात मार्गदर्शनपर माहीती कार्यकर्त्यांना दिली. अभियानात क्रियाशील सदस्यांचा फॉर्म कसा भरावा, कमीत कमी ५० सदस्य बनवुन क्रियाशिल सदस्य कसे बनावे, १०० रुपये भरून क्रियाशिल सदस्याची पुर्तता कशी



करावी, भरलेल्या पावतीची झेरॉक्स व सदस्य नोंदणी ॲपमधील ५० प्लस सदस्य संख्या केलेल्याचा पुरावा त्याची झेरॉक्स लावुन तो क्रियाशिल सदस्यांचा फॉर्म जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांच्याकडे मंगेश चव्हाण यांच्या माध्यमातुन कसा पाठवावा याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

या वेळी विक्रम पराजुली, नाथाभाऊ सलगर, प्रमिला खडसे, विकास सोरटे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# यशवंतराव चव्हाण सेंटरचे कृतज्ञता पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

यशवंतराव चहाण सेंगर, मुंबईच्या नवी मुंबई केंद्रातर्फे स्टर्लिंग कॉलेजच्या सभागृहात कृतज्ञता पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १३ व्यक्ती व चार संस्थांचा गौरव करण्यात आला. कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



संस्थेचे अध्यीश प्रमोद कर्नाड, सचिव डॉ. अशोक पाटील व कोषाध्यक्ष भाऊसाहेब शिंगाडे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पद्मश्री पुरस्कार प्राप्त अच्युत पालव उपस्थित होते. ते म्हणाले की गेल्याच वर्षी संस्थेने मला कृतज्ञता पुरस्कार २०२४ प्रदान केला होता. या पुरस्कार पद्मश्री पुरस्काराइतकाच मोलाचा आहे असे ते म्हणाले. नवी मुंबई केंद्राचे अस्वटन प्रमोद कर्नाड यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आता यशवंतराव चव्हाण सेंटर असे नामकरण झाल्याचे सांगितले.

क्लिक...क्लिक...!



**मुरूड : शिवरायांनी बांधलेल्या पद्मदुर्ग किल्ल्याचे मनमोहक रूप दत्त मंदिर टेकडीवरून दिसते. नारळ सुपारी झाडांची गर्द झाडी आणि समोर विशाल समुद्रकिनारा पाहण्यासाठी पर्यटक दत्त मंदिर टेकडीवर येतात. तेव्हा त्यांना पद्मदुर्गचेही दर्शन घडते.** (छाया : सुधीर नाझरे)

# युगलगीतांमध्ये रंगले पनवेलकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अवघ्या जगाला प्रेमाचा संदेश देणाऱ्या 'व्हॅलेंटाइन्स डे' आणि तमाम भारतीयांच्या लाडक्या मधुबालाच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड' ने नुकताच 'अभी ना जाओ छोडकर..' हा युगलगीतांचा बहारदार कार्यक्रम पनवेलमधील फडके नाट्यगृहात सादर केला.



या कार्यक्रमात जीवन में पिया तेरा साथ रहे.. (गूँज ऊठी शहनाई), पाँव छू ले ने दो फूलोंको (ताजमहल), ये वादा करो चाँद के सामने.. (राजहठ), अच्छा जी मैं हारी.. (काला पानी), जब दीप जले आना..(चितचोर), हम तुम युग युग से ये.. (मीलन), अभी ना जाओ छोडकर.. (हम दोनो) आणि अशी अनेक सदाबहार, विविधरंगी युगलगीते समीर विजयकुमार, विद्या करलगीकर, नीलेश निरगुडकर, दीपाली देसाई, संदीप शाह, गोविंद मिश्रा, नितीन डिस्कळकर, आकांक्षा भोईर आणि वंडरगर्ल मिथिला माळी यांनी तयारीने सादर केली. संदीप कोकीळ यांनी सूत्रसंचालन केले. महेंद्र गोखले व प्रवीण फाटक (सिंथेसायझर), सुभाष मालेगांवकर (ॲकॉर्डियन), विजय तांबे (बासरी) डॉ. अजित गोरे व जॉन (गिटार) अजय दामले (तबला व ऑक्टापॅड), अनिल खैरनार (ढोलक व कोंगो) आणि वेंकी कुलकर्णी (पर्कशन्स) या वादकांनी या सर्व गायकांना सुरेल, दमदार साथ केली.

या कार्यक्रमात सादर केल्या गेलेल्या सर्व गाण्यांचा अंतर्भाव असलेली सुबक, रंगीत गीत–पुस्तिका सर्व रसिकांना विनामूल्य वितरित करण्यात आली. विशेष म्हणजे, दोनशेहून अधिक युगुलांनी (दाम्पत्यांनी) या युगलगीत–मैफलीचा आनंद घेतला.

# माणगाव बस आगाराला अपुऱ्या गाड्या

## ◆ ग्रामीण आणि लांब पल्ल्यांच्या फेऱ्यांना 'ब्रेक'

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव बस आगार हा रायगड जिल्ह्यातील एक महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू आहे. हा परिसर मुंबई–गोवा व दिघी–पुणे महामार्गावर असल्याने येथे सतत प्रवाशांची वर्दळ असते, मात्र अपुऱ्या बसगाड्यांमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. स्थानिक तसेच लांबपल्ल्याच्या प्रवासासाठी पुरेश्या बसगाड्या उपलब्ध नसल्याने प्रवाशांना खासगी वाहतुकीचा अवलंब करावा लागतो. परिणामी, एसटी महामंडळाचे उत्पन्न घटत आहे, अपुऱ्या बसगाड्यांमुळे अडचणी वाढत आहेत.

सध्या माणगाव आगारात सध्या ३१ बसगाड्या कार्यरत आहेत. त्यापैकी१५ सीएनजी व १६ डिझेलवर चालणाऱ्या आहेत तर सहा खासगी भाडेतत्वावर घेतल्या असून त्या लांब पल्यांच्या प्रवाशांसाठी वापरल्या जात आहेत. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक आणि कोकणातील विविध भागांना जाणाऱ्या–येणाऱ्या गाड्या वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेकजण खासगी वाहनांकडे वळत आहेत. हा आगार १४ एप्रिल २०११मध्ये सुरू झाला. त्याला १४ वर्षे लोटली.



तरीही या आगारात जुन्या बस गाड्यांवर कामकाज चालवले जाते. त्यामुळे या आगाराची जुन्या गाड्यांची साडेसाती काही संपता संपेना झाली असून माणगाव बस आगाराला जुन्या गाड्यांचा डोस आजही दिला जात आहे.

माणगाव बस आगार हे मुंबई–गोवा महामार्गावरील कोकणचे प्रवेशद्वार म्हणून समजले जाते. येथील एसटी बसगाड्या अपुऱ्या असल्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्सचा आधार घ्यावा लागतो. याचा थेट फटका विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी आणि लहान – मोठ्या व्यावसायिकांना बसतो. एसटीच्या तुलनेत खासगी वाहनांचे भाडे जास्त असल्याने सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक ताण सहन करावा लागतो. विशेषतः ग्रामीण भागातून माणगावला येणाऱ्या – जाणाऱ्या नागरिकांसाठी हा मोठा जटील प्रश्न बनला आहे. या बस आगाराच्या उत्पन्न वाढीसाठी नव्या बसगाड्यांची आवश्यकता आहे. परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी धाराशिव येथे नुकताच परिवहन मंगळाच्या बस मधून प्रवास करून येत्या चार महिन्यांत २६०० बसेस महाराष्ट्रात देणार तर वर्षभरात आणखी ३००० बसेस असे एकूण ५६०० बसेस महाराष्ट्रात देणार असल्याची ग्वाही दिली.

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री परिवहन मंत्री असल्याने त्यांनी धाराशिव जिल्ह्याला २५ बस प्राप्त करून दिल्या. उर्वरित ५० बसेस देणार असल्याचे जाहीर केले, मात्र माणगाव बस आगाराला नवीन गाड्या कधी मिळणार ? असा संतप्त सवाल प्रवासी नागरीकातून बोलताना व्यक्त होत असून माणगाव आगाराला नव्या बसगाड्या मिळाल्या, तर प्रवाशांची गैरसोय दूर होऊन उत्पन्नवाढीस मदत होईल. अधिक बसगाड्या उपलब्ध झाल्यास दिवसाला जास्त फेर्या चालवता येतील आणि त्यामुळे अधिक उत्पन्न मिळू शकेल. शिवाय, लांबपल्ल्याच्या प्रवाशांसाठी विनाविलंब सेवा पुरवता येईल.

स्थानिक प्रवासी आणि नागरिकांकडून अनेक वेळा नवीन बसगाड्यांची मागणी होत आहे. तथापि, प्रशासनाकडून अद्याप ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. जर एसटी महामंडळाने माणगाव आगारात नवीन बसगाड्या उपलब्ध करून दिल्या, तर येथील वाहतुकीला गती मिळेल आणि स्थानिक नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होईल. सध्या या आगाराला जुन्या बस गाड्या आणि त्याही अपुऱ्या असल्याने दिवसाला सुमारे अडीज लाखाचे उत्पन्न मिळते. आणखी किमान ४० गाड्यांची माणगाव बसआगाराला गरज असून या डीजेल गाड्या उपलब्ध झाल्यास दिवसाला सरासरी चार लाखांपेक्षा जास्त उत्पन्न मिळू शकेल. तसेच वाढत्या बस गाड्यांबरोबरच वाहक चालक कर्मचारी वर्ग पुरेसा दिल्यास बस आगार फायद्यात येईल आणि माणगाव बस आगाराला नवी झळाळी मिळेल. माणगाव बस आगारात २०२३ पासून सहा खाजगी बस गाड्या भाडे तत्वावर गेतल्या असून त्या लांब पल्यासाठी वापरल्या जात असून त्यातून आगाराला उत्पन्न चांगले मिळत आहे. इतर ३१ गाड्या असून १६ डिझेल व १५ सीएनजी गाड्यांवर काम चालत आहे. यापैकी डीजेल गाड्या जुन्या असून त्या वारंवार दुरुस्ती करून काम चालवावे लागते. त्यामुळे उत्पन्नावर परिणाम होत आहे.

### *कर्मचाऱ्यांचीही वानवा*

***बस गाड्या व चालक–वाहक पुरेसे दिल्यास माणगावच्या आगाराला चांगले दिवस येतील. १५८ चालक–वाहक आगाराला कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे, मात्र १०८ चालक–वाहक सध्या काम करत आहेत. त्यामुळे चालक–वाहकांना डबल ड्युटी करावी लागते. १४ वर्षांनंतरही आगाराची वाताहत सुरूच आहे.***

# रोह्यात वाढतेय वायू प्रदूषण

## बांधकामांमुळे धुळीचे साम्राज्य

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहराचा झपाट्याने विकास होत आहे. मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू आहेत. विविध बांधकामे मोठ्या प्रमाणात चालू आहेत. रस्ते सह अनेक इमारती उभ्या राहत असताना त्यातून निर्माण होणारे धूळ हे हवेत पसरत असल्याने हवेत धुळीचे साम्राज्य पसरल्याचे दिसून येते.

इकडे धुळीचे साम्राज्य पसरले असताना दुसरीकडे औद्योगिक क्षेत्रातील येणारे रासायनिक दूषित हवेमुळे वायू प्रदूषण वाढल्याचे दिसून येत आहे. ही समस्या सोडवण्याची आवश्यकता असून वेळेस वायू प्रदूषण न रोखल्यास गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवेतील प्रदूषणमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहे. गेली काही दिवस घशाच्या आजारासह सर्दी खोकलाने नागरिक हैराण आहे. शहरात ठीक ठिकाणी बांधकाम चालू आहे.

धाटाव औद्योगिक क्षेत्रात अनेक रासायनिक कारखाने आहेत. या कारखान्यातून अनेक ठिकाणी अनेक कारखान्यातून काही कारखानदारांचा अपवाद वगळता सातत्याने हवेत रासायनिक वायू सोडले जात आहे. त्यामुळे धाटाव, भुवनेश्वर, रोहा परिसरात पहाटे वायू प्रदूषण झाल्याचे दिसून येते.

रोहा शहराचा आजूबाजूला मोठ्या प्रमाणात नव्याने इमारती उभे राहत आहेत. जुन्या इमारती तोडण्याचे काम सातत्याने होत आहे. परंतु हे काम होत असताना यातून निघणारे धूळ हवेत जात असल्याने हवेत धुळीचे प्रमाण वाढले आहे. महत्त्वाचे म्हणजे हे काम करत असताना धूळ उडू नये म्हणून कुठेही पाणी मारताना दिसून येत नाही. दुसरीकडे रोहा शहरात रोहा मुरुड मार्गावर सातत्याने चालू असलेले काम, रोहा शहरात विविध ठिकाणी चालू असलेले गटाराचे काम या ठिकाणीही माती खोदकाम होत असल्याने या मातीवरून वाहने येत जात असल्याने सातत्याने धुळीचे वातावरण त्या ठिकाणी तयार होत असल्याचे दिसून येते.

या वायू प्रदूषणाचा आरोग्य परिणाम होताना दिसत आहे सर्दी, खोकला, घशाचे आजार नागरिकांना होताना दिसत आहे. आता काही नागरिक मास्क लावूनच बाजारात येताना दिसत आहे. त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत गांभीर्याने घेऊन संबंधितांनी प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.



# कुंभार समाजाच्या समस्या सोडविणार –अनंत महाडकर



**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कुंभार समाज विखुरलेला असून या समाजाची संख्या सुधा मोठी आहे. सर्व समाज बांधव यांना एकत्रित करून सक्षम व प्रभावी कार्यकारणी गठित करून कुंभार समाजाच्या असणाऱ्या समस्या तातडीने सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असून भविष्यात त्यांना उज्वल दिवस आणून दाखवणार असल्याचे प्रतिपदान रायगड जिल्हा कुंभार समाजाचे अध्यक्ष अनंत महाडकर यांनी केले.

कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगड संस्थेचा तिसरा वर्धापनदिन व वधू–वर मेळावा प्रभाकर रामचंद्र गावंड हायस्कूल परळी येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या वेळी सामाजिक सेवेच्या माध्यमातून शैक्षणिक, संस्कृतीक, कला, क्रिडा, आध्यत्मिक व विविध क्षेत्रांमधून विशेष प्राविण्य मिळालेल्या समाज बांधवाचा गौरव, मरणोत्तर समाज भूषण पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. या वेळी सदरील कार्यक्रमास समस्त कुंभार समाजातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुंदन विन्हेरकर, राजाराम कुंभार यांनी केले. जिल्हातील तालुका अध्यक्ष युवक महिला पदाधिकारी समाजातील ज्येष्ठ–श्रेष्ठ पदाधिकारी, सदस्य महिला भगिनीं त्याचप्रमाणे वधू वर मेळाव्यासाठी आलेले तरुण तरुणी व पालकवर्ग यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन सुधागड तालुका कुंभार समाजाने केले. अध्यक्ष सुनील वाघोसकर, सचिव चंद्रकांत बिरवाडकर यांनी या साठी विशेष मेहनत घेतली.

# दफनभूमीसंदर्भात बोहरा समाजाचे निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

बोहरा समाजाच्या दफन भूमीमध्ये अन्य कोणीही त्रयस्थ बेवारस मृतदेह बेकायदेशीर रित्या दफन करीत असल्या बाबत बोहरा समाजाच्या वतीने संबंधित कार्यालयांना निवेदन दिले आहे.

जनाब हुसेन अमरावतीवाला साहेब, शेख हुनेद भाई, मुल्ला मूर्तझा, अलीअसगर धारीवाला, मुस्तफा धारिवाला, हुसेन जमाली, शब्बीर धारीवाला, युसुफ धारीवाला, मूफद्दल दाभिया, हुझैफा कर्जतवाला, मूर्तझा मोआय्यदी, ताहेर कर्जतवाला, इसाक, मोइझ, हुसेन कर्जतवाला, शब्बीर कर्जत वाला, मन्सूर आलीअसगर बोहरी, अलिअसगर उदयपूरवाला, मुफद्दल टिनवाला आदी यांनी समाजाच्या वतीने संबंधित कार्यालयाला निवेदन दिले.

जाऊदा बोहरा समाज कर्जतमध्ये सुमारे शंभर वर्षांपासून वास्तव्य करत आहेत. सध्याच्या स्थितीत कर्जत शहरात सुमारे दीडशे कुटुंब वास्तव्य करत आहेत पूर्वी आमचा समाज मृत पावलेल्या व्यक्तीला दफन करण्यासाठी लोणवळा, नेरळ, खोपोली आदी ठिकाणी जावे लागत होते. होते ते आमच्यासाठी त्रासदायक ठरत होते. समाजाच्या मागणीनुसार आम्हाला २००१ साली अधिकृतरित्या शासनामार्फत दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, कर्जत नगरपालिका क्षेत्रात मुद्रे खुर्द येथे सर्वे नंबर– १४ हिस्सा नं – ० यामध्ये ३१ गुंठे जागा ही दाऊदी बोहरा समाजाच्या दफनभूमीसाठी देण्यात आली आहे.

आमच्या समाजाच्या निदर्शनास आले आहे की, आमच्या दफनभूमी या भूखंडावर आमच्या परवानगीशिवाय बेवारस मृतदेह दफन केले जातात याआधीही अश्या घटना आणि प्रशासनाच्या निदर्शनास आणली होती याबाबत आम्ही कर्जत पोलीस ठाणे, कर्जत नगरपरिषद यांच्याकडे २२ एप्रिल २०२४ रोजी तक्रार दिली होती, त्यावेळी आम्हाला दोन्हीही कार्यालयांकडून आश्वासन देण्यात आले होते की सदरची घटना पुन्हा घडणार नाही तरीसुद्धा वारंवार या घटना घडत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे, त्यामुळे आमच्या समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत या मुळे आमचा समाजामध्ये नाराजीचा सूर आहे.

बोहरा समाजाच्या वतीने दिलेल्या निवेदनात प्रशासनास विनंती करण्यात आली आहे की, यापुढे असा प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा बोरा समाजातर्फे जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा संबंधित प्रशासनास दिला आहे. सदर निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी कर्जत तहसीलदार कर्जत मुख्याधिकारी कर्जत नगर परिषद पोलीस निरीक्षक कर्जत पोलीस ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.



# मराठी भाषा : अभिजाततेचा सन्मान, जागतिक विस्तार

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, ही महाराष्ट्रासाठी आणि मराठी भाषिकांसाठी अभिमानाची बाब आहे. या निमित्ताने ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे झाले. त्यामुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत एक मंतरलेले वातावरण महाराष्ट्रात तयार झाले आहे. मराठी भाषा तिचा विस्तार घराघरातील मराठी मराठीच्या अन्य भाषिक भगिनी मराठीचा विस्तार सात समुद्रापलिकडे गेलेली मराठी अशा अनेक विषयांवर चर्चा रंगत आहे ऊर भरून यावा असे वातावरण तयार होत आहे. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेचा ऐतिहासिक वारसा, तिची प्राचीनता, शासनाच्या योजना आणि जागतिक स्तरावरील आपल्या माय मराठीची नोंद या सर्व घटनाक्रमाचा उहापोह करणे औचित्यपूर्ण आहे.

**मराठी भाषेचे प्राचीन संदर्भ**

मराठी ही इंडो–आर्यन भाषाकुटुंबातील महत्त्वाची भाषा आहे. तिचा उगम संस्कृत भाषेतून झाल्याचे भाषाशास्त्रज्ञ मानतात. मराठीत प्राचीनतम लिखित संदर्भ १०–११ व्या शतकातील 'शिलाहार ताम्रपटां'मध्ये आढळतात. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी लिहिलेले लीळाचरित्र हे मराठीत उपलब्ध असलेले सर्वांत प्राचीन गद्य स्वरूपातील साहित्य आहे. मुकुंदराजांनी रचलेला विवेकसिंधू हा ग्रंथ मराठी भाषेतील पहिला ग्रंथ आहे. तसेच ज्ञानेश्वरांनी रचलेली भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) ही मराठीत लिहिलेली पहिली मोठी साहित्यकृती मानली जाते. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांमध्ये सापडलेल्या जुन्या पांडू लिपी, शिलालेख, यामध्ये देखील मराठी भाषेची नोंद सापडते.

**मराठी भाषेचा अभिजात दर्जा**

भारत सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी काही निकष ठरवलेले होते. यामध्ये

१. भाषेला १५०० वर्षांपेक्षा अधिक प्राचीन लिखित साहित्य परंपरा असावी.

२. स्वतंत्र व्याकरण आणि समृद्ध साहित्य असावे.

३. संस्कृतीवर महत्त्वपूर्ण प्रभाव असावा.

लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकयांचे अभंग, दासबोध, पंडितराज जगन्नाथांची संस्कृत–मराठी लेखन परंपरा आणि पुढे येणाऱ्या संत साहित्यामुळे मराठी भाषा या निकषांमध्ये बसते. या संदर्भात पुरावा देण्यासाठी शासनाने शर्थीचे प्रयत्न केले होते. विविध स्तरावरून यासाठी पाठपुरावा केला जात होता. ३ ऑक्टोबर २०२४ ला मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. त्यानंतर दिल्ली येथील अखिल भारतीय साहित्य संमेलन येत असल्यामुळे सध्या तमाम मराठी मुलुखामध्ये आनंद व्यक्त केल्या जात आहे. मंतरलेल्या आणि भारावलेल्या वातावरणातच दिल्लीत होणाऱ्या सारस्वतांच्या मेळामध्ये अनेकांनी कुच करायचे ठरविले आहे.

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

**शासनाचे भाषा संवर्धनाचे उपाय**

मराठी भाषा टिकवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत.

मराठी भाषा विभागाची स्थापना राज्य शासनाने २०११ मध्ये केली. शासनाने स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन केला असून, तो जतन आणि संवर्धनाचे विविध धोरण आखतो.

मराठी भाषा धोरण: २०१३ मध्ये राज्य शासनाने मराठी भाषा संवर्धन आणि प्रसारासाठी धोरण आखले.

मराठी भाषेच्या संरक्षणासाठी कायदा: २०२२ मध्ये 'महाराष्ट्र मराठी भाषा अधिनियम' संमत करण्यात आला, ज्यामुळे शासकीय कामकाजात मराठी अनिवार्य करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात प्रत्येक शाळेमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे.

माय मराठीच्या संवर्धनाचा विचार व्हावा यासाठी मराठी भाषा भवन मुंबई येथे होणार आहे

शासकीय कार्यालयामध्ये मराठी भाषेमध्ये कामकाज करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

मराठी भाषा दिवस (२७ फेब्रुवारी): कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिवस साजरा केला जातो.

मराठी शाळांसाठी अनुदाने: इंग्रजी माध्यमाकडे झुकणाऱ्या प्रवृत्तीला आवर घालण्यासाठी मराठी शाळांना अनुदाने दिली जातात.

**बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि जागतिक पातळीवरील मराठी भाषा**

महाराष्ट्राबाहेर मराठी भाषेचा प्रचार आणि संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बृहन्महाराष्ट्र मंडळ करते. अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, दुबई, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांमध्ये बृहन महाराष्ट्र मंडळ कार्यरत आहे. या ठिकाणी मराठी सण उत्सव व भाषा संदर्भातील कार्यक्रम नियमितपणे घेतली जातात. महाराष्ट्रात केवळ चांदा ते बांदा मराठी आहेत अशी धारणात चुकीची ठरते मध्यप्रदेश, तेलंगाना, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा, गुजरात एवढेच नव्हे तर सीमा लगत नसतानाही दिल्लीमध्ये जवळपास पाच लाख मराठी नागरिक रहिवासी आहेत. एकट्या दिल्लीमध्ये शेकडो मराठी मंडळे कार्यरत असून स्वातंत्र्यपूर्व काळापासून त्यांनी आपले मराठी सण उत्सव परंपरा राजधानी दिल्लीमध्ये सुरू ठेवली आहे नवी दिल्लीमध्ये दोन मराठी शाळा व अनेक मराठी मंडळे मराठी भाषेची सेवा कसोशीने करत आहे.

**भारताबाहेर मराठी भाषा:**

कविवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी आपल्या कवितेमध्ये ....

भाषेचे आणि जातीचे काय असते नाते<br>
भाषा म्हणजे धान्य धर्म म्हणजे जाते<br>
जो जिथे जन्मला तेच त्याची भाषा<br>
पऱ्हाटीकडून बोंडाचीच कराल ना आशा

असे भाषा आणि धर्माचे वर्णन करतात. त्यामुळे महाराष्ट्रात राहणारे हिंदू, मुस्लिम, शीख, जैन सर्व जाती धर्मांची मंडळी मराठीमध्ये बोलतात. देवनागरी लिपी आणि अनेक भाषांमधले शब्द स्वतःमध्ये सामावून घेण्याची वृत्ती यामुळे ही भाषा लोकप्रिय आणि अधिक बोलल्या जाते जगामध्ये दहाव्या क्रमांकावर मराठी भाषा बोलली जाते जवळपास दहा कोटी जनता ही भाषा बोलते. काही ठिकाणचे मराठी मंडळ तर भारतातील भाषिक उपक्रमांना लाजवेल अशा प्रकारे कार्यक्रमांचे आयोजन करते. यामध्ये उल्लेखनीय नोंदी म्हणजे लंडनमध्ये मराठी भाषेचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अमेरिकेच्या अनेक विद्यापीठांत मराठी भाषा शिकवली जाते.ऑस्ट्रेलिया आणि कॅनडात मराठी सण–उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. कराचीतील मराठी मंडळी अजूनही गणेशोत्सवाला विसरली नाही.

दुबई आणि सिंगापूरमध्ये मराठी भाषिक मोठ्या संख्येने वास्तव्य करतात. जगाच्या पाठीवर जाई ठिकाणी मराठी माणूस गेला त्या ठिकाणी तो तीन गोष्टी करतो एक म्हणजे मराठी मंडळ स्थापन करतो, दुसरा म्हणजे गणेशोत्सवात गणपतीला विसरत नाही आणि तिसरा म्हणजे महाराष्ट्राने देशाला दिलेल्या आदर्शांना त्याला विसरणे शक्य नसते. त्यामुळे शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व महापरिनिर्वाण दिन, दिवाळी, दसरा, रक्षाबंधन अशा अनेक सणांना मराठी भाषा मराठी उत्सव आणि मराठी अस्मितेचा मुलामा चढलेला असतो त्यामुळे भाषेसोबत संस्कृती हे देखील मराठी भाषा संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

**जागतिक स्तरावर मराठी भाषेचे स्थान**

मराठी ही जगभरातील प्रमुख भाषांपैकी एक आहे. काही महत्त्वाचे आकडेवारी दाखले –

जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये १०व्या क्रमांकावर मराठी भाषा आहे. भारतात हिंदीनंतर दुसऱ्या क्रमांकाची मातृभाषा असलेली भाषा.९ते १० कोटीहून अधिक लोकांची मातृभाषा मराठी आहे.

**दिल्लीतील महोत्सव**

दिल्लीमध्ये मराठी साहित्य संमेलन होणे, ही एक ऐतिहासिक बाब आहे. महाराष्ट्राबाहेर हे संमेलन होत असून, ते मराठी भाषेच्या जागतिक पातळीवरील महत्त्वाचे स्थान दर्शवते. या वेळी साहित्य, भाषा आणि संस्कृती यांचे चिंतन होत असून, विविध चर्चासत्रे, परिसंवाद आणि ग्रंथप्रदर्शन आयोजित केले जात आहेत. दिल्लीच्या विज्ञान भवनातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या संमेलनाचे उद्घाटन झाले. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक असलेल्या तारा भवाळकर भूषविले. ज्येष्ठ नेते शरद पवार हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील शेकडो प्रकाशक आपल्या प्रकाशनासह दिल्लीत दाखल झाले होते. महाराष्ट्राच्या जिल्ह्यात जिल्ह्यात घट्ट पाळीमुळे असणाऱ्या ग्रंथ चळवळीतील अनेक मान्यवर प्रकाशक साहित्यिक कवी लेखक समीक्षक दिल्लीत आहेत त्यानिमित्ताने संपूर्ण देशात भारावलेले वातावरण निर्माण झाले. मराठी सारस्वतांमध्ये तर या संमेलनाचे प्रचंड आकर्षण असून विविध उपक्रम संमेलनाची पूर्वतयारी म्हणून गावागावात सुरू झाली होती.

खरे म्हणजे आमची माय मराठी कधीच लोकल नव्हती ती कायम अटकेपार ग्लोबलच होती. मराठी ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून ती आता आंतरराष्ट्रीयस्तरावर पोहचली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठीला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून, तिच्या संवर्धनासाठी शासन आणि बृहन्महाराष्ट्र मंडळे योगदान देत आहेत. अशा साहित्य संमेलनांच्या माध्यमातून मराठीचा जागतिक प्रसार अधिक व्यापक होईल, यात शंका नाही.

**–प्रवीण टाके, जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड**

# ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर ऐतिहासिक विजय

## ‘कांगारूं’नी जिंकला चॅम्पियन्स ट्रॉफीतील पहिला सामना

**लाहोर : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाच्या संघाने वनडे क्रिकेटमध्ये ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरूद्ध चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सामन्यात पाच विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. २००९नंतर म्हणजेच १६ वर्षांनी ऑस्ट्रेलियाने चॅम्पियन्स ट्रॉफीत पहिल्या सामन्यात विजय मिळवला आहे.

इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना आठ बाद ३५१ धावांचा डोंगर उभारला होता. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात आजवर कोणत्याच संघाने इतकी मोठी धावसंख्या उभारली नव्हती. इंग्लंडने बेन डकेटच्या १६५ धावांच्या विक्रमी खेळीच्या जोरावर ही कामगिरी आपल्या नावे केली, पण हार मानेल तो ऑस्ट्रेलियाचा संघ कसला. बडे खेळाडू संघाचा भाग नसतानाही ऑस्ट्रेलियाच्या नवख्या संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या



इतिहासातील ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

ऑस्ट्रेलियाचे संघातील वरिष्ठ खेळाडू स्टीव्ह स्मिथ आणि ट्रॅव्हिस हेड स्वस्तात बाद झाले, पण नवा सलामीवीर मॅथ्यू शॉर्टने ६३ धावांची खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. यानंतर मार्नस लबुशेनने ४७ धावांची खेळी केली, तर संघाचा यष्टीरक्षक फलंदाज जोश इंग्लिसने वनडेमधील आपले पहिले शतक झळकावत मोठा विक्रमही आपल्या नावे केला. इंग्लिसने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील संयुक्त जलद शतक झळकावले आहे. त्याने ८६ चेंडूत सहा षटकार आणि आठ चौकारांसह १२० धावांची नाबाद खेळी केली. यानंतर अ‍ॅलेक्स कॅरीसह त्याने केलेली भागीदारी मॅचविनिंग ठरली.

कॅरीने ६३ चेंडूत आठ चौकारांसह ६९ धावांची खेळी केली, तर ग्लेन मॅक्सवेलनेही येताच चौकार-षटकारांचा पाऊस पाडला. त्याने १५ चेंडूत दोन षटकार आणि चार चौकारांसह इंग्लिसला चांगली साथ दिली. इंग्लंडच्या गोलंदाजांची या नव्या ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी धुलाई केली. जोफ्रा आर्चरविरूद्ध १० षटकांत ८२ धावा केल्या, ज्यात त्याने एक विकेट घेतली. याशिवाय जो रूट वगळता सर्व गोलंदाजांनी एकेक विकेट घेतली.

तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकल्याने इंग्लंडला गोलंदाजीसाठी पाचारण केले होते. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना आठ बाद ३५१ धावा केल्या होत्या. फिल सॉल्ट १० धावा करून बाद झाला. यानंतर बेन डकेटने १६५ धावांची ऐतिहासिक खेळी केली. जो रूटने ६८ धावा केल्या. जोस बटलर २३ धावा, लिव्हिंगस्टोन १४ धावा, तर जोफ्रा आर्चरने २१ धावा करत संघाला विक्रमी धावसंख्या उभारून दिली. ऑस्ट्रेलियाकडून बेन द्वारशुईसने तीन विकेट्स, झाम्पा आणि लबुशेन यांनी प्रत्येकी दोन, तर मॅक्सवेलने एक विकेट घेतली.

# डब्ल्यूपीएलमध्ये युपीकडून दिल्लीचा दणदणीत पराभव

## ग्रेस हॅरिसची शानदार हॅट्ट्रिक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

युपी वॉरियर्सने वूमन्स प्रीमियर लीग २०२५मधील पहिल्या विजयाचा आनंद लुटला आहे. ग्रेस हॅरिसच्या हॅट्ट्रिकच्या जोरावर युपीने दिल्लीचा ३३ धावांनी पराभव केला. दीप्ती शर्माच्या नेतृत्वाखाली युपीचा यंदाचा हा पहिला विजय आहे. या विजयात चिनेल हेन्रीने ६२ धावांची खेळी करत योगदान दिले.

प्रथम फलंदाजी करताना युपीने चिनेल हेन्रीच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर २० षटकांत नऊ गडी गमावून १७७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ १९.३ षटकात १४४ धावा करून सर्वबाद झाला.

लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात काही खास नव्हती. त्यांना पहिला धक्का पाचव्या षटकात २६ धावांच्या स्कोअरवर कॅप्टन मेग लॅनिंगच्या रूपात बसला. लॅनिंगला क्रांती गौरने क्लीन बोल्ड केले. तिला केवळ पाच धावा करता आल्या,



तर सलामीवीर शेफाली वर्मा २४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. दिल्लीकडून जेमिमाह रॉड्रिग्जने सर्वाधिक ५६ धावांची खेळी खेळली. तिने ३५ चेंडूत आठ चौकार आणि एक षटकार ठोकला. यूपीकडून क्रांती गौर आणि ग्रेस हॅरिसशिवाय चिनेल हेन्री आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. ग्रेस हॅरिसने २.३ षटकांत १५ धावा देत चार विकेट घेतल्या आणि तिने हॅट्ट्रिकही आपल्या नावे केली.

दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध वेस्ट इंडिजच्या चिनेल हेन्रीने २३ चेंडूंत आठ षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने ६२ धावा केल्या. हेन्रीने अरुंधती रेड्डीला तीन षटकार गमावत १८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले.

दिल्लीच्या गोलंदाजांनी ८९ धावांत यूपीच्या सहा विकेट्स घेतल्या होत्या. यूपीकडून किरण नवगिरेने २० चेंडूत १७ धावा केल्या. तत्पूर्वी, मारिजन कॅपने वृंदा दिनेशला (४) स्वस्तात बाद केले. जेस जोनासेनने दीप्ती शर्मा (१३) आणि ताहलिया मॅकग्रा (२४) यांची विकेट घेतली, तर कॅपने ग्रेस हॅरिसला (२) पॅव्हेलियनमध्ये पाठवले, पण तरीही युपीने चांगले पुनरागमन करत विजयाची नोंद केली.

# युसूफ पठाणचे २० चेंडूत झंझावाती अर्धशतक

## इंटरनॅशनल मास्टर्स लीगमध्ये भारताचा श्रीलंकेवर विजय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

इंडिया मास्टर्स विरुद्ध श्रीलंका मास्टर्स यांच्यातील लढतीने इंटरनॅशनल मास्टर्स लीग टी-२० स्पर्धेला सुरुवात झाली आहे. नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर रंगलेल्या सलामीच्या लढतीत युसूफ पठाणने अवघ्या २० चेंडूत अर्धशतक साजरे केल्याचे पहायला मिळाले. हा सामना भारताने चार धावांनी जिंकला.

श्रीलंकेच्या संघाने या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. सहाव्या क्रमांकावर बॅटिंगला आलेल्या युसूफ पठाणने या सामन्यात २२ चेंडूत तीन चौकार आणि सहा उत्तुंग षटकाराच्या मदतीने ५६ धावा कुटल्या. त्याने



तब्बल २५४.५५च्या स्ट्राइकरेटने धावा केल्या.

युसूफ पठाण आधी या सामन्यात इंडिया मास्टर्सच्या ताफ्यातून खेळणाऱ्या स्टुअर्ट बिन्नी यानेही आपल्या भात्यातील फटकेबाजीचा नजराणा पेश केला. २६ धावांवर इंडिया मास्टर्स संघाने अंबाती रायडू आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या रूपात दोन विकेट्स गमावल्या होत्या. त्यानंतर स्टुअर्ट बिन्नी आणि गुरुक्रीत सिंग मान या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ८७ धावांची दमदार भागीदारी रचली. गुरुक्रीतने सात चौकाराच्या मदतीने ३२ चेंडूत ४४ धावा केल्या, तर बिन्नीने ३१ चेंडूत तीन चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ६८ धावांची खेळी केली.

अखेरच्या ५० चेंडूत युवी आणि युसूफ पठाण यांनी इंडिया मास्टर्सकडून तुफान फटकेबाजी केली. युवराजने २२ चेंडूत दोन चौकार आणि दोन षटकाराच्या मदतीने नाबाद ३१ धावांची खेळी केली. या जोडीने अखेरच्या षटकात ७६ धावांची भागीदारी रचत निर्धारित २० षटकात धावफलकावर ४ बाद २२२ धावा लावल्या. प्रत्युत्तरात श्रीलंका संघ २१८ धावा करू शकला.

# अ‍ॅलेक्स कॅरीने टिपले तीन अप्रतिम झेल

**लाहोर : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या चौथ्या सामन्यात इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचा संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात इंग्लंड संघ प्रथम फलंदाजी करीत असताना ऑस्ट्रेलियाच्या अ‍ॅलेक्स कॅरीच्या एकापेक्षा एक कमाल तीन झेलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड सामन्यात स्फोटक फलंदाज फिल सॉल्ट बेन डकेटसह सलामीला आला. सॉल्टने इंग्लंडला दणक्यात सुरुवात करून दिली, पण तो दुसऱ्याच षटकात बाद झाला. अ‍ॅलेक्स कॅरीने हवेत झेप घेत केवळ एका हाताने सॉल्टचा झेल घेतला. तो पाहून सगळेच थक्क झाले. यानंतर सहाव्या षटकात द्वारशुईसला अजून एक विकेट मिळाली. मोठा फटका खेळण्यासाठी गेलेल्या जॅमी स्मिथचा कॅरीने शानदार झेल टिपला. पुढे रूटची विकेट गमावल्यानंतर मैदानावर आलेल्या हॅरी ब्रुकला मोठी खेळी करता आली नाही. कॅरीने मागे धावत जाऊन झेल टिपत ब्रुकला बाद केले.



# जाहिरातीच्या सेटवर धोनी अन् सनी एकत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

दुबईत भारत विरुद्ध पाकिस्तान सामना रंगलो. मुंबईत एका जाहिरातीच्या शूटदरम्यान माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी याने वेळ काढत मॅच पाहण्याचा आनंद घेतला. विशेष म्हणजे त्याच्या जोडीला अभिनेता सनी देओलही येऊन बसला.

**मॅचचा घेतला आनंद**

एमएस धोनी आणि सनी देओलचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. एका जाहिरातीच्या शूटचा हा सेट दिसतोय. समोर प्रोजेक्टरवर भारत विरुद्ध पाक मॅच लावली आहे. धोनीसोबत सेटवरील सर्व क्रू मॅच पाहत आहेत. तोच मागून सनी पाजीची एन्ट्री होते. पडद्यावर पाकिस्तानला धूळ चारणारा अभिनेता सनी देओल धोनीच्या सेटवर मॅच पहायला येतो. हे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले आहे.

## टर्फ क्रिकेट टूर्नामेंट



**पनवेल : रायगड जिल्हा माहेश्वरी सभा यांच्या वतीने पुरुष आणि महिला टर्फ क्रिकेट टूर्नामेंटचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. ओरियन मॉलच्या मागे ग्राउंड झिरो टर्फ येथे झालेल्या या क्रिकेट स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवली. या वेळी प्रवीण नावंधर, रामेश्वर कलंत्री यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

# जोस इंग्लिसची वीरेंद्र सेहवागच्या विक्रमाशी बरोबरी

**लाहोर :** चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियन बॅटर जोस इंग्लिसच्या भात्यातून यंदाच्या स्पर्धेतील सातवे शतक पहायला मिळाले. या मॅच विनिंग सेंच्युरीसह त्याने भारताचा माजी स्फोटक फलंदाज वीरेंद्र सेहवाग याच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे.

ऑस्ट्रेलियन विकेटकिपर बॅटर इंग्लिससाठी हे शतक खास ठरले, कारण त्याचे चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतीलच नव्हे; तर वनडे कारकिर्दीतील हे पहिले शतक आहे. एवढेच नाही शतक झळकवताना संघाला त्याने विक्रमी विजय मिळवून दिला. २००२च्या हंगामात सेहवागनेही इंग्लंडविरुद्धच्या सामन्यातच ७७ चेंडूत शतक साजरे केले होते. सेहवाग १०४ चेंडूत १२६ धावांची खेळी करून बाद झाला होता, पण लाहोरच्या मैदानात इंग्लिस ८६ चेंडूत १२० धावा करून नाबाद राहिला.

**खास क्लबमध्येही एन्ट्री**

जोस इंग्लिस हा ऑस्ट्रेलियाकडून तिन्ही फॉर्मेटमध्ये खेळताना पाहायला मिळाले आहे. दोन कसोटी सामन्यात त्याच्या खात्यात एका शतकाची नोंद आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्येही त्याच्या भात्यातून शतक आले आहे. वनडेतील पहिल्या शतकासह आता तो ऑस्ट्रेलियाकडून तिन्ही फॉर्मेटमध्ये शतक झळकवणाऱ्या खेळाडूंच्या खास क्लबमध्ये एन्ट्री मारली आहे. ऑस्ट्रेलियाकडून क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात शतक झळकवणारा तो चौथा खेळाडू ठरलाय. याआधी शेन वॉटसन, ग्लेन मॅक्सवेल आणि डेविड वॉर्नर यांनी कसोटी, वनडे आणि टी-२०मध्ये ऑस्ट्रेलियाकडून शतकी खेळी केली होती.





**पनवेल : शिवजयंतीनिमित्त कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे कोकण विभागीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पनवेल येथील ओम नलावडे याने १० वर्षांखालील गटात ५० मीटर फ्री स्टाइल प्रकारात रौप्यपदक पटकावले. स्पर्धेत पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून स्पर्धक सहभागी झाले होते. ओमला प्रशिक्षक हसन शेख यांचे मार्गदर्शन लाभले. विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांनी ओमचे अभिनंदन केले.**

# मास्टर ब्लास्टर सचिनची क्रेझ कायम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एका बाजूला चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचा थरार सुरू असताना दुसऱ्या बाजूला क्रिकेटचा देव अर्थात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने श्रीलंकेविरुद्धच्या लढतीने इंटरनॅशनल मास्टर्स लीग टी-२० स्पर्धेला सुरुवात केली.

नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमीच्या मैदानात रंगलेल्या इंडिया मास्टर्स विरुद्ध श्रीलंका मास्टर्स यांच्यातील सामन्यात रॉबिन मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनं अंबाती रायडूच्या साथीने संघाच्या डावाची सुरुवात केली. पहिल्याच षटकात सचिनच्या भात्यातून बॅक टू



बॅक चौकार पहायला मिळाले. वयाच्या ५१व्या वर्षीही त्याच्या भात्यातून निघालेला कव्हर ड्राइव्ह चाहत्यांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा असा होता.

श्रीलंकेचा माजी क्रिकेटर आणि दिग्गज जलदगती गोलंदाज इसुरु उडाना घेऊन आलेल्या पहिल्याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर सचिनच्या भात्यातून कडक कव्हर ड्राइव्ह पहायला मिळाला. याच षटकातील तिसऱ्या चेंडूवरही सचिनने पुल शॉटवर चौकार मारला.

सचिनला पुन्हा मैदानात खेळताना पाहून चाहत्यांचा आनंद अगदी गगनाला भिडला होता. सोशल मीडियावर सचिनच्या कडक कव्हर ड्राइव्हचा व्हिडीओ व्हायरल होताना दिसतोय. मास्टर ब्लास्टरने सुरुवात दमदार केली, पण दोन चौकाराच्या मदतीने १० धावा काढून तो तंबूत परतला. त्यानंतर ड्रेसिंग रुममधील त्याचा व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतोय.

नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात मास्टर ब्लास्टर सचिनची झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. अजूनही क्रिकेट हा आमचा धर्म अन् सचिन आमचा देव या आशयाची फलकबाजी करत चाहत्यांनी मास्टर ब्लास्टरवरील प्रेम दाखवून दिले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com